# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

August - September 2023 / Issue No. 11 | Price : Rs. 30/-



## चांद्रविजय


'चांद्रयान-३' चंद्रावर उतरलं आणि देशानं आणखी एक इतिहास रचला. मंगळावर पोचलेला भारत चंद्रावरही पोचला. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांनी स्थापन केलेल्या वालचंदनगर उद्योग समूहाचा चांद्रयान ३ मोहिमेत अमूल्य योगदान आहे.



## महाराष्ट्र शासनाचे उद्योगरत्न, उद्योगमित्र, उद्योगिनी व उत्कृष्ठ मराठी उद्योजक पुरस्कार प्रदान



माननीय रतनजी टाटा
'उद्योगरत्न पुरस्कार'



मान. आदर पुनावाला
'उद्योगमित्र पुरस्कार'



मान. गौरी किर्लोस्कर
' उद्योगिनी पुरस्कार'



मान. विलासराव शिंदे
'उत्कृष्ठ मराठी उद्योजक पुरस्कार'

**९६ वी वार्षिक सभा व वार्षिक समारोह २२ सप्टेंबर, २०२३**



# इस्रोच्या चांद्रयान -३ मोहिमेत वालचंदनगर कंपनीचे अमूल्य योगदान

## शेठ वालचंद हिराचंद यांनी स्थापन केलेली वालचंदनगर कंपनी




**कोल्हापूर :** 'चांद्रयान-३' चंद्रावर उतरलं आणि देशानं आणखी एक इतिहास रचला. मंगळावर पोचलेला भारत चंद्रावरही पोचला. कविता आणि उपमांमध्येच दिसणारा चंद्र विज्ञानाने आज खऱ्या अर्थाने आपल्या कवेत घेतला. हा रोमहर्षक क्षण लाखो भारतीयांनी आपल्या नयनांनी पाहिली. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर विक्रम लँडरनं अतिशय सफाईनं लँडिंग केलं. भारतासाठी अत्यंत आनंददायी क्षण असलेल्या या मोहिमेत इंदापूर तालुक्याच्या वालचंदनगरमधील वालचंदनगर कंपनीचा मोलाचा सहभाग आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांनी स्थापन केलेला वालचंदनगर उद्योग समूह आहे.

चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर चंद्रयान ३ यशस्वीपणे उतरवण्याचा मान भारताने अखेर पटकावला आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ यान उतरवणारा भारत जगातील पहिला देश ठरला. भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) शास्त्रज्ञांच्या कष्टाचं सोनं झालं आहे.  चांद्रयान-३ने चंद्राच्या चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी सॉफ्ट लँडिंग केलं आहे. असं करणारा भारत जगातला पहिलाच देश ठरला आहे. आतापर्यंत कुणालाही चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लँडिंग करण्यात यश आलेलं नाही. आतापर्यंत जगातल्या फक्त ४ देशांना चंद्रावर लँडिंग करण्यात आलं आहे. त्यात भारत, रशिया, अमेरिका आणि चीन यांचा समावेश आहे. या क्लबमध्ये भारताचा चंद्रयान-३ च्या यशस्वी लँडिंगनंतर समावेश झाला आहे.

संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलेल्या महत्वाकांक्षी 'चांद्रयान-३' मोहिमेत इंदापूर तालुक्याच्या वालचंदनगरमधील वालचंदनगर कंपनीचा मोलाचा सहभाग आहे. चांद्रयानाच्या यशामुळे पुणे जिल्ह्यातील वालचंदनगर कंपनीच्या माध्यमातून ' चांद्रयान-३'  हे यान यशस्वीरित्या आकाशात झेपावल्याने आनंद द्विगुणित झाल्याचे , वालचंदनगर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी चिराग दोशी यांनी सांगितले. ' गेल्या पाच दशकांपासून वालचंदनगर

कंपनी एअरोस्पेस क्षेत्राशी संलग्न काम करत आहे. अनेक महत्वाची उपकरणे तयार करत आहोत. ' चांद्रयान-३' मोहिमेतही कंपनीचा सहभाग असल्याचा मोठा अभिमान आहे. त्यासाठी कंपनीतील इंजिनीअर, कामगारांचाही मोठा हातभार लागला असल्याचेही ते सांगतात.

भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्त्रो) च्या चांद्रयान-३ ही महत्वाकांक्षी मोहीम सुमारे चार वर्षापासून सुरु होती. संपूर्ण जगाचे लक्ष चांद्रयान-३ मोहिमेकडे लागले होते. नुकतेच आंध्रप्रदेशच्या श्री हरिकोटामधील सतीश धवन अंतराळ केंद्रातून चांद्रयान-३ गगन भरारी यशस्वी ठरली. रॉकेटच्या सहाय्याने चांद्रयान आकाशाकडे झेपावले.

चांद्रयान मोहिमेच्या उड्डाणासाठी वापरण्यात आलेल्या रॉकेटला सहा बूस्टर मोटर्स होत्या. यातील चार बूस्टर मोटर्सची (एस-२००) निर्मिती वालचंदनगर कंपनीत झाली आहे. यामध्ये हेड एन्ड सेगमेंट, मिडल सेगमेंट, नोझल एन्ड सेगमेंट, तसेच प्लेक्स नोझल कंट्रोल टॅक या महत्वाच्या उपकरणाचा समावेश आहे. ही सर्व उपकरणे उड्डाणाच्या पहिल्या स्टेजसाठी वापरण्यात आली. या पूर्वी ' चांद्रयान-१' आणि ' चांद्रयान-२' मोहिमेमध्ये वालचंदनगर कंपनीचा मोलाचा वाटा होता. तसेच मंगळयान मोहिमेतही वालचंदनगर कंपनीचे मोठे योगदान होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून वालचंदनगर कंपनीचा देश उभारणीच्या कामात मोलाचा सहभाग राहिला आहे. एअरोस्पेस, डिफेन्स, अणुऊर्जा क्षेत्रातही कंपनी देशाच्या प्रगतीसाठी कार्यरत आहे. कंपनीने पाणबुडीसाठी महत्वाचे असणारे अनेक भागही तयार केले आहेत.



## 'गगनयान'मध्ये कंपनीचा सहभाग

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांनी स्थापन केलेल्या वालचंदनगर उद्योग समूहाच्या माध्यमातून जल, भूमी, आकाश, क्षेत्रात खूप मोठा सहभाग असून, भारताच्या महत्वाकांक्षी गगनयान मोहिमेसाठी महत्वाची उपकरणे बनविण्याचे काम वालचंदनगरमध्ये सुरु आहे. यातील काही उपकरणे कंपनीने तयार करुन इस्त्रोकडे हस्तांतर केली आहेत. तसेच अनेक उपकरणे बनविण्याचे काम सुरु आहे.

## वालचंदनगर

तत्कालीन काळात शेठ वालचंद हिराचंद यांनी पुणे जिल्ह्यातील इंदापूर शहराच्या पश्चिमेस ३८ किलोमीटरवर एक औद्योगिक शहर वसवण्याचा निर्णय घेतला. पूर्वी हे गाव ' कळंब' नावाने ओळखलं जायचं. पण वालचंदांनी याठिकाणी विविध उद्योगांची पायाभरणी केल्यामुळे हे गाव पुढे ' वालचंदनगर' म्हणून प्रसिद्धीस आलं. वालचंदनगरमध्ये मार्सलँड प्राईज कंपनीच्या सहकार्याने साखर कारखाना उभारण्यात आला. आजूबाजूला काही जोडधंदेही त्यांनी उभारले. येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आणि कुटुंबीयांसाठी वसाहती सोयीसुविधा निर्माण करण्यात आल्या. पुढे या कारखान्याचे रूपांतर सिमेंट, बाष्प जनित्रे, युद्धनौकांसाठी उच्च शक्तिशाली अचूक व गिअर बॉक्स, अणुभट्टी साधने इ. बनविणाऱ्या मोठ्या कारखान्यात झालं. याबरोबरच अणुऊर्जा प्रकल्प, उपग्रह क्षेपणास्त्र साधने, देशाच्या संरक्षणासाठी लागणारे क्षेपणास्त्रांचे सुटे भाग आदीचे उत्पादन या ठिकाणी झाले. भारतामध्ये स्वदेशीचा पुरस्कार करून आत्मनिर्भरतेची सुरुवात करण्याचे श्रेय शेठ वालचंद हिराचंद यांना जाते.

# महाराष्ट्र चेंबरचे पदाधिकारी

## सन २०२३-२०२४



**ललित गांधी**
अध्यक्ष



**अनिलकुमार लोढा**
वरिष्ठ उपाध्यक्ष



**करूणाकर शेट्टी**
उपाध्यक्ष, मुंबई - १



**शुभांगी तिरोडकर**
उपाध्यक्ष, मुंबई - २



**रविंद्र माणगावे**
उपाध्यक्ष, प.महाराष्ट्र



**कांतीलाल चोपडा**
उपाध्यक्ष, उ. महाराष्ट्र (१)



**तनसुख झांबड**
उपाध्यक्ष, मराठवाडा



**नितिन बंग**
उपाध्यक्ष, उ. महाराष्ट्र (२)



**श्रीकृष्ण परब**
उपाध्यक्ष, कोकण



**संजय सोनवणे**
चेअरमन, उ. महाराष्ट्र शाखा



**सागर नागरे**
सेक्रेटरी जनरल (प्र)

## विश्वस्त




आशिष पेडणेकर



खुशालचंद्र पोद्दार



विश्वजित डहाणूकर



संजय घोडावत




विलास शिरोरे



कैलास खंडेलवाल

## MACCIA - महाराष्ट्र रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट प्रा. लि. चे संचालक



ललित गांधी



कांतीलाल चोपडा



विजय वेदमुथा




नितीन इंगळे



चंद्रशेखर सिंग



निलेश चव्हाण



उमेश वानखेडे

MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

August - September 2023/ Issue No. 11

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **अनिलकुमार लोढा**
  उपाध्यक्ष
  **करुणाकर शेट्टी**
  **शुभांगी तिरोडकर**
  **रविंद्र माणगावे**
  **कांतीलाल चोपडा**
  **नितिन बंग**
  **तनसुख झांबड**
  **श्रीकृष्ण परब**
- सरकार्यवाह
  **सागर नागरे**
- संपादक
  **विनी दत्ता**
- सहसंपादक
  **अविनाश पाठक, सचिन यादव**

- **उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालय**
  २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक - १.
  फोनः (०२५३)२५७७७०४
  ई-मेलः nsk@maccia.org.in
- **रत्नागिरी जिल्हा कार्यालय**
  जावकर प्लाझा, जयस्तंभ, रत्नागिरी.
- **जळगाव जिल्हा कार्यालय**
  २१-ए, श्रीराम स्टेट बँक कॉलनी, रिंगरोड, जळगाव - ४२५००१.

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

# अंतरंग

१. मनोगत

२. चांद्रयान ३ मोहिम यशस्वी

३. जन विश्वास विधेयक मंजूर

४. भारतीय अँग्री इनोव्हेटर्स व स्टार्टअप्सकडून अर्ज

५. इ- इनव्हाईस नवे बदल

६. मैत्री अध्यादेश निर्गमित

७. रतन टाटा उद्योग, नवोपक्रम, स्टार्टअप आणि सामाजिक जाणिवेचे चालते बोलते विद्यापीठ : राज्यपाल रमेश बैस

८ लघु व मध्यम उद्योगांना ४० टक्के स्वस्त वीज मिळणे शक्य : ललित गांधी

९. मायटेक्स एक्स्पो २०२३ ट्रेड फेअर

१०. मराठवाडा व्यापारी परिषद संपन्न

११. जालना येथे लवकरच 'ड्रायपोर्ट' होणार : केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे

१२. मराठवाडा विभागातर्फे थेट अध्यक्षांशी संवाद

१३. महाराष्ट्र वस्तू, सेवाकर (सुधारणा) विधेयक २०२३ मंजूर

१४. धुळेत डिसेंबरमध्ये चेंबर कार्निवल होणार

१५. महाराष्ट्र चेंबर व्यापारी उद्योजकांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म व मोफत वेबसाईट देणार



## संपादकीय..

ललित गांधी
**अध्यक्ष**

**चांद्रयान-३** चे यशस्वी लँडींग हा भारताची मान जगात उंचावणारा प्रसंग ! या ऐतिहासिक यशामध्ये 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांनी स्थापन केलेल्या 'वालचंद इंडस्ट्रीज लि.' व 'हिंदुस्थान एरोनॉटीक्स लि.' या दोन कंपन्यांचा महत्वपूर्ण सहभाग हा समस्त देशवासीयांबरोबरच 'महाराष्ट्र चेंबर' च्या संपूर्ण परिवारासाठी आनंदाचा व अभिमानाचा क्षण आहे.

९६ वर्षे पूर्ण झालेले 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर' हे अशा विकासाच्या प्रक्रियेत सातत्याने अग्रेसर राहीले आहे. अशा गौरवशाली संस्थेचे आपण सर्वजण एक घटक आहोत. ज्या संस्थेने महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाचा पाया रचला, महाराष्ट्राच्या व्यापार विकासाचे धोरण राबविले. राज्याच्या व्यापार, उद्योग, कृषि उद्योग, सेवा उद्योगाच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत आहे.

९६ वर्षांची ही गौरवशाली परंपरा आपल्या सर्वांच्या सहकार्याने राज्याच्या व देशाच्या विकासासाठी प्रभावीपणे उपयोगी होईल यासाठी आपल्याला भगीरथ प्रयत्न करावयाचे आहेत.

९६ व्या वर्षाचा संक्षिप्त अहवाल या अंकामधून आपल्याला सादर करताना मला मनास्वी आनंद होत आहे. विविध यशस्वी उपक्रम, सभा, सेमिनार्स, बैठका अशा भरगच्च कार्यक्रमांच्या माध्यमातून 'महाराष्ट्र चेंबर' ने आपली विकासपूरक घोडदौड कायम ठेवली आहे.

उद्योगांचे प्रलंबित २३०० कोटी रूपये चे अनुदान वितरण, प्लास्टीक बंदीतून काही उत्पादनांना वगळणे, अनुदान योजनांना मुदतवाढ अशा महत्वपूर्ण यशासाठी राज्याचे मुख्यमंत्री नाम. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री नाम. देवेंद्रजी फडणवीस, उद्योगमंत्री नाम. उदयजी सामंत यांचे महत्वपूर्ण सहकार्य लाभले.

यावर्षातील एक उल्लेखनीय कार्यक्रम म्हणजे 'राजभवन' च्या दरबार हॉल मध्ये संपन्न 'शेठ वालचंद हिराचंद' यांचे ५० वे स्मृतीव्याख्यान संपूर्ण वालचंद परिवार, लोकसभेचे सभापती व महामहिम राज्यपाल यांच्या उपस्थितीने हा समारोह व अध्यक्ष पदग्रहण समारोह संस्मरणीय ठरला.

महाराष्ट्र चेंबरच्या सभासदांच्या व्यापार-उद्योगांना देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी सुरू केलेली 'महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पो-MITEX' ही व्यापार, उद्योग प्रदर्शनांची श्रृंखला मुंबई च्या दमदार सुरूवातीनंतर आता नाशिक-पूणे असे मार्गक्रमण करीत राज्य पादाक्रांत करेल.

आंतरराष्ट्रीय व्यापार वृध्दिसाठी चेंबर सातत्याने कार्यरत आहे. यावर्षी 'इंडोनेशिया' सरकारच्या आमंत्रणावरून ऑक्टोबर २०२३ मध्ये जाणारे शिष्टमंडळ, त्यापाठोपाठ नोव्हेंबर २०२३ मध्ये 'हाँगकाँग' व फेब्रुवारी २०२४ मध्ये 'दुबई' येथे महाबीज २०२४ चे संयुक्त आयोजन त्याचबरोबर विविध देशांच्या व्यापार शिष्टमंडळासमवेत महाराष्ट्रात बैठका या विविध माध्यमातून सभासदांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ खुली करून देण्यासाठी चेंबर प्रयत्नशील आहे.

विभागीय व जिल्हा स्तरावर कार्यालयांच्या माध्यमातून विस्ताराबरोबरच सभासदांच्या आपापसात व्यापार वृध्दिसाठी विविध उपक्रमांचे आयोजन हा येणाऱ्या वर्षातील उपक्रमांचा प्राधान्यक्रम असेल.

**शंभराव्या वर्षाकडील ही वाटचाल आपणा सर्वांच्या सहभागाने अधिक तेजोमय व दिमाखदार होईल या विश्वासासह धन्यवाद व शुभेच्छा!**








# जन विश्वास विधेयक मंजूर, व्यापारी उद्योजकांना मोठा दिलासा!

## व्यापाऱ्यांना कोर्ट-कचेरीपासून मुक्तता मिळणार

**दिल्ली :** लोकसभेनंतर राज्यसभेतही (Rajya Sabha) बहुचर्चित जनविश्वास विधेयक (Jan Vishwas Bill 2023) मंजूर झालं आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल (Piyush Goyal) यांनी हे विधेयक २ ऑगस्ट रोजी राज्यसभेत मांडलं. व्यापाऱ्यांना मोठा दिलासा देणाऱ्या या विधेयकाला मंजुरी मिळाल्यामुळे व्यापारी वर्गात आनंदाचं वातावरण आहे. छोट्या छोट्या कायद्याचं उल्लंघन केल्यानंतर होणारी तुरुंगवासाची शिक्षा बदलून, तिचं रुपांतर आर्थिक दंडात करण्यात आलं आहे. क्लिष्ट कायद्याच्या बंधनात अडकल्यामुळे छोट्या व्यापाऱ्यांना व्यवसाय करण्यास अडथळे येत होते. हे अडथळे दूर करण्याचं काम जन विश्वास विधेयकाने केलं आहे.

**या विधेयकात विशेष काय?**

या विधेयकात १९ मंत्रालयाशी संबंधित ४२ अधिनिमयांच्या १८३ तरतुदींमध्ये संशोधनाचा प्रस्ताव देण्यात आला होता.

यामध्ये सार्वजनिक कर्ज कायदा १९४४, फार्मसी अधिनियम १९४८, सिनेमॅटोग्राफ अधिनियम १९५२, कॉपीराईट अधिनियम १९५७, ट्रेड मार्क्स अधिनियम १९९९, रेल्वे अधिनियम १९८९, माहिती तंत्रज्ञान कायदा२०००, औषधे आणि सौंदर्य प्रसाधने

### जन विश्वास विधेयक नेमकं काय?

अनेक जुन्या कायद्यांत बदल करुन जन विश्वास विधेयक आणलं आहे. या विधेयकामुळे तब्बल ४२ कलमांतर्गत छोट्या छोट्या गुन्ह्यांमध्ये होणाऱ्या गुन्ह्यांना शिक्षेपासून मुक्तता देण्यात आली आहे. जेलवारी ऐवजी गुन्हेगारांना आर्थिक दंड ठोठावला जाणार आहे. हे तेच छोटे छोटे कायदे आहेत ज्यामुळे छोट्या व्यापाऱ्यांना व्यवसाय करण्यात अनेक अडथळे येत होते. या विधेयकामुळे व्यापाऱ्यांना खुल्या मनाने व्यवसाय करण्याला चालना मिळेल. मोदी सरकारने २२ डिसेंबर, २०२२ रोजी जन विश्वास विधेयक लोकसभेत मांडलं होतं. त्यानंतर संयुक्त संसदीय समितीकडे (JPC) हे विधेयक पाठवण्यात आलं होतं. मार्चमध्ये या विधेयकाला अंतिम रुप देण्यात आलं. लोकसभेत विधेयक मंजूर झाल्यानंतर राज्यसभेतही त्याच्यावर मंजुरीची मोहोर उटवली.






कायदा १९४०, मोटार वाहन कायदा १९८८, अन्न सुरक्षा आणि मानक कायदा २००६, मनी लाँडरिंग प्रतिबंध कायदा २००२, पेटंट कायदा१९७०, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६, मोटार वाहन कायदा १९८८ यासह ४२ कायद्यांचा समावेश आहे.

या कायद्यांशी संबंधित होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये आता तुरुंगावारीची शिक्षा बदलून दंडाचा निकष लावण्यात आला आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांना कोर्ट–कचेरीपासून मुक्तता मिळणार आहे. शिवाय व्यवसाय करणे आणखी सुरळीत होणार आहे.




### जन विश्वास विधेयकामुळे व्यवसायात सुलभता

- झाडे तोडल्यास किंवा जाळल्यास आता जेलऐवजी दंडाची तरतूद
- वायू प्रदूषण करणाऱ्या कंपन्या, उद्योगांना मोठा आर्थिक दंड
- वायू प्रदूषण करणाऱ्या औद्योगिक कंपनीला जेलऐवजी १५ लाखांचा दंड
- संवाद माध्यमांमध्ये चुकीची माहिती किंवा आक्षेपार्ह मेसेजला आता जेलऐवजी दंडाची शिक्षा
- रेल्वे स्थानकांवर भीक मागणाऱ्यांना भिकाऱ्यांना यापुढे तुरुंगवासाची शिक्षा नाही

**प्रश्न : जन विश्वास विधेयकाचा उद्देश काय? नव्या विधेयकामुळे व्यवसाय करणे सोपे कसे होईल?**

उत्तर : अनेक जुन्या कायद्यांमध्ये संशोधन करुन जन विश्वास विधेयक आणलं आहे. ४२ कायद्यांमध्ये छोट्या गुन्ह्यांसाठी जेलची शिक्षा आर्थिक दंडात बदलली आहे. त्यामुळे छोटे उद्योग करणाऱ्यांना क्लिष्ट नियमांमुळे बंधने येणार नाहीत.

**प्रश्न : या विधेयकात नेमक्या तरतुदी कोणत्या? कोणत्या क्षेत्रात बदल होतील?**

उत्तर : जन विश्वास विधेयकाचं लक्ष्य पर्यावरण, कृषी, मीडिया, उद्योग–व्यापार, प्रकाशन यासह ४२ कायद्यांमधील १८० गुन्ह्यांना गुन्हे या श्रेणीतून हटवण्यात आलं आहे. ज्या क्लिष्ट तरतुदींमुळे छोट्या व्यवसायांना अडचणी येत होत्या, त्या दूर करण्यात आल्या आहेत.

**प्रश्न : अशा कायद्याची आवश्यकता काय?**

उत्तर : सूक्ष्म, लघु आणि मध्यम व्यवसाय हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. दरडोई उत्पन्नात याचं महत्त्वाचं योगदान आहे. त्यामुळे या उद्योगांची लालफितीच्या कारभारातून मुक्तता करण्याचा निर्णय सरकारने घेतला. सध्या १५३६ कायदे असे आहेत ज्यामध्ये भारतात व्यापार–उद्योगांना नियंत्रित करणाऱ्या ७० हजार तरतुदी आहेत. या तरतुदींमुळेच छोट्या व्यापाऱ्यांना विस्तार करणे कठीण काम झालं होतं.


**सध्या कोणत्या कायद्यात किती शिक्षेची तरतूद?**

भारतीय वन अधिनियम, १९२७ : आरक्षित वनातील झाडे तोडणे, लाकूड कापणे, अतिक्रमण, यासाठी पूर्वी ६ महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा ५०० रुपयांचा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होती. जन विश्वास विधेयकामध्ये तुरुंगवासाची शिक्षा हटवण्यात आली आहे. तर ५०० रुपयांऐवजी ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात येणार आहे.

- **हवा प्रदूषण :** हवा प्रदूषण करणाऱ्या औद्योगिक कंपन्यांना आर्थिक दंडासह ६ वर्षांची जेलवारीची शिक्षा होती. त्यामध्ये बदल करुन आता १५ लाख रुपयांच्या दंड इतकीच शिक्षा ठेवण्यात आली आहे.
- **माहिती तंत्रज्ञान कायदा :** यामध्ये संवाद माध्यमांमधून आक्षेपार्ह मेसेज, चुकीची माहिती पसरवल्यास जेलची शिक्षा होती. शिवाय गोपनियतेचा भंग केल्यास ५ लाखांच्या दंडाची तरतूद होती. शिवाय दोन वर्षांची जेलवारी आणि १ लाखांचा दंड किंवा दोन्ही अशीही शिक्षा होती. मात्र नव्या विधेयकानुसार आता २५ लाखांच्या दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.
- **पर्यावरण संरक्षण :** अनावधानाने कायद्याचं उल्लंघन झाल्यास १ लाख ते १५ लाख रुपयांचा दंडाची शिक्षा आहे. पूर्वी या गुन्ह्यात पाच वर्षे कारावास आणि एक लाख रुपये दंडाची तरतूद आहे.
- **कॉपीराईट अधिनियम :** आधीच्या कायद्यात अधिकाऱ्यांची फसवणूक, प्रभाव टाकणे, खोटे बोलणे यासाठी तुरुंगवासाची शिक्षा होती ती काढून दंडाची शिक्षा ठेवण्यात आली आहे.
- **मोटर वाहन अधिनियम :** वैध परमिटशिवाय मोटर वाहन चालवणाऱ्यांना सध्ये सहा महिने जेल आणि १० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा आहे. यामध्ये बदल करुन दंडाची रक्कम हटवण्यात आली आहे. जेलची शिक्षा कायम ठेवली आहे.
- **रेल्वे अधिनियम :** रेल्वे स्थानकावर भीक मागणाऱ्यांना किंवा फेरीवाल्यांना दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.



# रतन टाटा उद्योग, नवोपक्रम, स्टार्टअप आणि सामाजिक जाणिवेचे चालते बोलते विद्यापीठ : राज्यपाल रमेश बैस



## उद्योगरत्न, उद्योगमित्र, उद्योगिनी आणि उत्कृष्ट मराठी उद्योजक पुरस्कार प्रदान

**मुंबई :** रतन टाटा हे केवळ एक व्यक्ती नाहीत तर ते स्वतः एक संस्था आहेत. रतन टाटा यांनी चहा, मीठ ते स्टील, ऑटोमोबाईल्स, आयटी, विमानबांधणी, आदरातिथ्य अशा वैविध्यपूर्ण क्षेत्रांसह टाटा उद्योग समूहाला जागतिक समूहात रूपांतरित केले. ते उद्योग, नवोपक्रम, स्टार्टअप आणि सामाजिक जाणिवेचे चालते बोलते विद्यापीठ आहेत. महाराष्ट्र राज्याचा पहिला 'उद्योगरत्न' पुरस्कार स्वीकारून त्यांनी महाराष्ट्र शासनाची आणि पुरस्काराची प्रतिष्ठा वाढवली आहे' , असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

उद्योग विभागाच्या वतीने देण्यात येणारे 'उद्योगरत्न', 'उद्योग मित्र', 'उद्योगिनी' आणि 'उत्कृष्ट मराठी उद्योजक' पुरस्कार जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्यपाल रमेश बैस बोलत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव मनोज सौनिक, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे आदी यावेळी उपस्थित होते.

पहिला उद्योगरत्न पुरस्कार पद्मविभूषण रतन टाटा यांच्यावतीने टाटा उद्योग समुहाचे अध्यक्ष चंद्रशेखरन यांनी स्वीकारला. उद्योगमित्र पुरस्कार आदर पुनावाला यांना, उद्योगिनी पुरस्कार गौरी किर्लोस्कर यांना तर उत्कृष्ट मराठी उद्योजक पुरस्कार विलास शिंदे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. 'उद्योगरत्न' पुरस्काराचे स्वरूप २५ लक्ष रुपये, सन्मानचिन्ह व मानपत्र होते. 'उद्योगमित्र' पुरस्काराचे स्वरुप १५ लक्ष रुपये, सन्मानचिन्ह व

मानपत्र, 'उद्योगिनी' पुरस्काराचे स्वरुप ५ लक्ष रुपये, सन्मानचिन्ह व मानपत्र तर 'उत्कृष्ट मराठी उद्योजक' पुरस्काराचे स्वरुप ५ लक्ष रुपये, सन्मानचिन्ह व मानपत्र होते.

यावेळी राज्यपाल रमेश बैस यांनी महत्त्वाचे 'उद्योग पुरस्कार' सुरू केल्याबद्दल महाराष्ट्र शासन आणि उद्योग विभागाचे अभिनंदन केले. राज्यपाल रमेश बैस म्हणाले, जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले तरुण राष्ट्र म्हणून भारताला आज अभूतपूर्व अशी संधी आहे. जगातील अनेक विकसित देश त्यांच्या कामगारांचा पुरवठा पूर्ण करण्यासाठी भारताकडे पाहत आहेत. या संधींचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्राने कौशल्य विकास आणि उद्योजकतेला सर्वाधिक महत्व दिले पाहिजे. महाराष्ट्राच्या पुढील २५ वर्षांच्या औद्योगिक विकासासाठी ब्ल्यू प्रिंट तयार करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी व्यापारी, उद्योगपती आणि विविध चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या प्रमुखांची उच्चाधिकार समिती स्थापन करावी, अशी सूचना त्यांनी केली.

आदर पूनावाला यांच्या नेतृत्वाखाली सीरम इन्स्टिट्यूटने 'कोविशील्ड' ही लस विकसित करून देशाचा नावलौकिक केला आहे. किर्लोस्कर हे उद्योगक्षेत्रातील एक प्रसिद्ध नाव आहे. गौरी किर्लोस्कर यांना देण्यात येणारा 'उद्योगिनी' पुरस्कार सर्व महिला उद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. तर सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे यांना दिला जाणारा मराठी उद्योजक पुरस्कार हा महाराष्ट्रातील प्रगतीशील शेतकऱ्यांचा पुरस्कार आहे, असे राज्यपाल श्री.बैस यांनी यावेळी नमूद केले.

**रतन टाटा म्हणजे माणसातला देव**
**माणूस : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

आपण कुणीही देव पाहिलेला नाही. पण, देव चराचरात आहे. गरजूंच्या मदतीला देव नेहमी धावतो. यंदाच्या उद्योगरत्न पुरस्कारासाठी आपण अशाच एका माणसातल्या देवमाणसाची निवड केली आहे. टाटा म्हणजे अढळ विश्वास, गुणवत्तेची खात्री आणि प्रचंड सामाजिक भान असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी काढले.

आपण विविध क्षेत्रात विशेष असे योगदान दिलेल्या मान्यवर व्यक्तीस महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करत असतो. त्याच धर्तीवर उद्योजकांचा सन्मान करण्यासाठी आपण उद्योग पुरस्कारांची सुरवात केली असल्याचे ते म्हणाले. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. महाराष्ट्र राज्य हे देशाच्या औद्योगिक प्रगतीचं ग्रोथ इंजिन आहे. या ग्रोथ इंजिनाची सगळ्यात मोठी शक्ती उद्योग क्षेत्र आहे. म्हणूनच हे उद्योग पुरस्कार देऊन राज्यातील उद्योग विश्वाचा सन्मान करण्याचे शासनाने ठरविल्याचे त्यांनी सांगितले. उद्योगरत्न पुरस्कारासोबतच 'उद्योग मित्र', 'उद्योगिनी' आणि उत्कृष्ट मराठी उद्योजक या चारही सत्कारमुर्तीमधील मोठे साम्य म्हणजे विश्वास हे असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आपल्या राज्याला उद्योगपतींच्या अनेक पिढ्यांनी घडविले. अगदी पारतंत्र्यापासून उद्योगांनी या देशासाठी योगदान दिले आहे. आज मोठ्या प्रमाणावर सेवाक्षेत्र, आयटी क्षेत्र राज्यात आणि देशात विकसित झाले आहे. उद्योग क्षेत्राने आजवर अब्जावधी हातांना रोजगार दिला आहे. आपल्याला कृषी आधारित उद्योगांना देखील राज्यात प्रोत्साहन द्यायचे आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील ५ ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर्सचे योगदान द्यायचे आहे. दावोसच्या वर्ल्ड इकोनॉमिक फोरमच्या बैठकीत आम्ही १ लाख ३७ हजार कोटींचे करार केले. त्यातील ८५ टक्के करारांची अंमलबजावणी सुरु झाली आहे. आज परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अव्वल क्रमांकावर आला आहे, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नमूद केले.

**सर्वोत्कृष्ट मानव संसाधन महाराष्ट्रात– उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

टाटा ट्रस्टने आधुनिक भारताच्या विकासात अमूल्य असे योगदान दिले आहे. जगात पाचव्या क्रमांकावर असलेला टाटा समूह महाराष्ट्रात आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. महाराष्ट्र प्रत्यक्ष गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर असल्याचे नमूद करून सर्वोत्कृष्ट मानव संसाधन महाराष्ट्रात असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. श्री. फडणवीस म्हणाले, देशाचे स्टार्टअप कॅपिटल महाराष्ट्रात आहे. सर्वाधिक स्टार्टअप महाराष्ट्रात आहे. स्टील इंडस्ट्रीत गुंतवणूक वाढत आहे, भविष्यातील 'स्टील सिटी' म्हणून गडचिरोली नावारूपाला येत आहे. ट्रीलियन इकॉनॉमीची वाटचाल करताना शासन सर्व विभागांना सोबत घेऊन पुढे जात असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान टाटा ट्रस्ट सेवाभावी असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

प्रास्ताविकात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुरस्कार सुरू करण्यामागची भूमिका विषद केली. त्यांनी उद्योग मित्र व रोजगार मित्र हे नाविन्यपूर्ण प्रकल्प तसेच उद्योग मित्र व्हॅनबाबत माहिती दिली.

यावेळी मनोगत व्यक्त करताना टाटा ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रशेखरन म्हणाले की, उद्योजकांना पुरस्कार हा राज्य शासनाचा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. महाराष्ट्र हे देशातील उद्योगात अग्रेसर असलेले राज्य आहे. त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य आणि उद्योगाच्या बाबत दूरदृष्टी असणारे राज्य म्हणूनही ओळखले जाते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीजचे सदस्य आणि ॲग्रो एक्स्पर्ट समितीचे अध्यक्ष विलासराव शिंदे म्हणाले, मी एक शेतकरी असून शासनाने मराठी उद्योजक पुरस्कार दिल्यामुळे यापुढे शेतीला उद्योगाचा दर्जा मिळण्याकडे वाटचाल सुरू झाली, असे म्हणावे लागेल. शेतकऱ्यांनी एकीने शेती केली तर शेतीत निश्चितच बदल घडू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्री. पुनावाला म्हणाले, सिरम इन्स्टिट्यूट ही देशाची, महाराष्ट्राची संस्था आहे. कोविड काळात ९० टक्के लस महाराष्ट्राने पुरविली. महाराष्ट्राची कार्य संस्कृती वेगळी आहे, त्यामुळे यापुढेही आपण महाराष्ट्रातच उद्योगाला प्राधान्य देऊ. हा पुरस्कार राज्य, देश तसेच सिरम इन्स्टिट्यूट मधील कामगार आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार असल्याचे त्यांनी सांगितले. गौरी किर्लोस्कर यांनी उद्योग क्षेत्रात महिलांसाठी समान संधी निर्माण केल्याबद्दल राज्य शासनाचे आभार मानले. उद्योग क्षेत्रातील आजोबा व वडिलांचे योगदानाचा उल्लेख करताना भारताच्या निर्माण शक्तीवर त्यांचा विश्वास होता, असेही त्या म्हणाल्या.

### ‘टाटा’ म्हणजेच विश्वास : मुख्यमंत्री शिंदे निवासस्थानी जाऊन पुरस्कार वितरण

उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा पहिला ‘उद्योगरत्न’ पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक, पद्मविभूषण रतन टाटा यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या कुलाबा येथील निवासस्थानी २५ लाख रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह व मानपत्र या स्वरूपातील पुरस्कार देण्यात आला.

‘टाटा’ म्हणजे ट्रस्ट, टाटा म्हणजे विश्वास, अशी जगभर ख्याती असलेल्या उद्योग समूहाचे रतन टाटा यांना हा पुरस्कार देण्याने पुरस्काराचा सन्मान वाढला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी गौरवोद्गार काढले. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, ‘टाटा सन्स’चे चेअरमन तथा महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा आदी उपस्थित होते.

दरम्यान टाटा यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी टाटा यांच्यासमवेत चंद्रशेखरन आदींशी उद्योग आणि राज्यातील विकास प्रकल्पांविषयी चर्चा केली.

---



## उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांचे सर्वांकडून विशेष कौतुक

**महाराष्ट्र सरकारतर्फे उद्योग भुषण पुरस्कार देण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणणारे शिल्पकार उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह उद्योग जगताने विशेष कौतुक केले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनीही त्यांचे विशेष कौतुक केले. समारंभानंतर माध्यम प्रतिनिधी व विविध उद्योजकांनी उद्योगमंत्र्यांच्या कौतुकासाठी गराडा घातला होता.**

## महाराष्ट्र वस्तू, सेवाकर (सुधारणा) विधेयक २०२३ मंजूर

### ‘एक देश, एक करप्रणाली’ सूत्रानुसार जीएसटी कायद्यात दुरुस्ती : उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार

**मुंबई :** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करणारे महाराष्ट्र वस्तू व सेवाकर (सुधारणा) विधेयक २० जुलै, २०२३ रोजी विधानसभेत मंजूर करण्यात आले.

उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्तमंत्री अजित पवार यांनी हे विधेयक मांडताना सभागृहास सांगितले की, ‘एक देश एक करप्रणाली’ सूत्रानुसार हे विधेयक मांडण्यात आले आहे. केंद्र सरकारने कायद्यात सुधारणा केल्यानंतर सर्व राज्यांद्वारे संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक सुधारणा करणे अनिवार्य असते. त्यानुसार विधेयक मांडण्यात आले आहे. या विधेयकामध्ये महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मधील २२ कलमे व १ अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये प्रामुख्याने न्यायाधीकरण, डेटा अर्कायव्हल पॉलिसी, गुन्ह्यांच्या तरतुदीचे सुलभीकरण (decriminalization व गुन्ह्यांच्या कंपाउंडिंगचे सुलभीकरण), इनपुट टॅक्स क्रेडीट, नोंदणी व परतावा आदी विषयांच्या कलमांमध्ये सुधारणा प्रस्तावित आहे. सुचविण्यात आलेल्या सुधारणा ह्या कार्यपद्धतीचे सुलभीकरण व करदात्यांचे हीत याबाबी लक्षात घेऊन प्रस्तावित केल्या असल्याचेही वित्तमंत्री श्री. अजित पवार यांनी स्पष्ट केले.

केंद्रीय वस्तू व सेवाकर परिषदेच्या शिफारशींनुसार, ३० मार्च २०२३ रोजी मंजूर केलेल्या वित्तीय कायदा २०२३ अन्वये केंद्र सरकारने केंद्रीय वस्तू व सेवाकर अधिनियम २०१७ यामध्ये सुधारणा केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, केंद्रीय वस्तू व सेवाकर अधिनियम २०१७ व महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यातील तरतुदींमध्ये एकसूत्रता राखण्यासाठी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. त्यानुसार विधानसभेत विधेयक मंजुरीची ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

# महाराष्ट्र शासनाच्या प्रथम 'उद्योगभूषण' पुरस्काराचे मानकरी, महाराष्ट्र चेंबरशी सर्वांचेच ऋणानुबंध...



**रतन टाटा :** टाटा उद्योग समूहाचे अध्यक्षपद भूषविलेल्या रतन टाटा यांचे भारतीय उद्योगांना जागतिक स्तरावर प्रस्थापित करण्यात महत्त्वाचे योगदान आहे. जग्वार, लॅण्ड रोव्हर, कोरस ग्रुप ऑफ स्टील कंपनी यासारख्या बड्या परकीय कंपन्यांत करून टाटा उद्योग समूहाचे अधिराज्य निर्माण करण्यात रतन टाटा यांचा सिंहाचा वाटा आहे. स्टील, ऑटोमोबाईल्स, टी कंपनी, लक्झरी हॉटेल्स, एरोनॉटिकल अशा विविध उद्योग क्षेत्रात टाटा उद्योग समूहाचे नाव आहे. दानशूर उद्योगपती म्हणूनही रतन टाटा यांचा लौकिक आहे. महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांनी जे.आर.डी. टाटा समुहाबरोबर संयुक्त बांधकाम कंपनी यशस्वीपणे चालवली.



**गौरी किर्लोस्कर :** आंतरराष्ट्रीय स्तरावर कीर्ती संपादन केलेल्या किर्लोस्कर घराण्याचा संपन्न वारसा वृद्धिंगत करण्यात गौरी किर्लोस्कर यांचा महत्त्वाचा वाटा आहे. किर्लोस्कर ऑइल इंजिन्स, गझ्झर मशीनरीज आणि पंप उत्पादक, अर्का फिनकॉर्प तसेच पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये किर्लोस्कर उद्योग समूहाचे दिमाखदार पदार्पण करण्यात गौरी किर्लोस्कर यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक संचालक व माजी उपाध्यक्ष लक्ष्मणराव किर्लोस्कर यांची ५ व्या पिढीची प्रतिनिधी असलेल्या गौरी किर्लोस्कर.



**विलास शिंदे:** कृषी अभियांत्रिकी क्षेत्रात एमटेक केल्यानंतर शेती हा मुख्य व्यवसाय विलास शिंदे यांनी निवडला. शेतीतज्ञ, कृषीमाल बाजारपेठ तज्ञ, व्यवस्थापन तज्ञ म्हणून त्यांची ओळख आहे. 'सह्याद्री फार्म्स' या कंपनीचे संचालक म्हणून त्यांनी सर्वाधिक द्राक्ष निर्यात करणारी तसेच टोमॅटो प्रक्रिया करणारी कंपनी म्हणून नावारूपास आणली. प्रक्रियायुक्त शेती उत्पादनाची ४२ देशांमध्ये निर्यात, सह्याद्री फॉर्म्स पोस्ट हार्वेस्ट केअर लिमिटेड या कंपनीत ३१० कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आणण्यात यश. विलास शिंदे हे महाराष्ट्र चेंबर चे सदस्य व चेंबरच्या ॲग्रो एक्स्पर्ट समितीचे चेअरमन आहेत.



**आदर पुनावाला :** सातत्यपूर्ण संशोधन आणि नाविन्याचा शोध घेत मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सिरम इन्स्टिट्यूटला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्यात आदर पुनावाला यशस्वी झाले आहेत. सिरम इन्स्टिट्यूट ही सर्वाधिक रोगप्रतिबंधक लसीचे उत्पादन करणारी जगातील सर्वात मोठी कंपनी आहे. या कंपनीची उत्पादने ३५ देशांत निर्यात होतात. 'ओरल पोलिओ लस' ही जागतिक बाजारपेठेत बेस्ट सेलर ठरली आहे. डेंग्यू, फ्ल्यू, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावरील प्रतिबंधक लसीचे उत्पादन, त्याचबरोबर कोविशिल्ड लसीचे उत्पादन करून त्यांनी आत्मनिर्भर भारताची प्रचिती दिली आहे. आदर पुनावाला हे 'महाराष्ट्र चेंबर' चे सन्माननीय पेट्रन मेंबर आहेत.



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्य आणि ॲग्रो एक्स्पर्ट समितीचे चेअरमन विलासराव शिंदे यांना महाराष्ट्र शासनाचा ' उत्कृष्ठ मराठी उद्योजक पुरस्कार' मिळाला. त्याबद्दल सह्याद्री फार्म येथे पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करतांना उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, नाशिक शाखेचे संजय सोनवणे, ॲग्रीकल्चर समितीचे को-चेअरमन दत्ता भालेराव, राजाराम सांगळे.




# Applications Invited from Indian Agri Innovators and Startups

- **What is the definition of a start-up?**

We consider the DIPP definition of a start-up for this program. ("The DIPP amended the definition,as per which an entity will be considered a 'start-up'up to a period of 10 years from the date of incorporation/ registration and if its turnover for any of the financial Years since incorporation/registration does not exceed Rs 100 crore"),

- **Is the program only for agriculture and allied sector?'**

Yes, it is only for agriculture and allied sector start-ups,

- **Is a sole proprietor eligible to apply for pre-seed stage and seed stage funding?**

No. As per the DIPP definition, partnerships, LLP.& Pvt Ltd. Company are eligible for seed stage,However, a pre-seed/idea stage entrepreneur may apply and Undergo training and later apply for registration in order to receive funding.

- **Is there any minimum qualification criterion for enrolment in both the proqrammes?**

No, there is no such prescribed criterion.Programme is open for all Entrepreneurial applicants irrespective of their qualification.

- **Is there any maximum age limit for the applicant?**

There is no maximum age limit however the applicant should not be a minor.

- **Is it compulsory for the owner of the start-up to attend the training program or can His/her team member attend?**

Founder or anyone from his/her core team is permissible to attend the training. However, it is suggestive for the founder to attend the training programme.

- **What will be the funding procedure?**

After the completion of two months training programme, R-ABI will forward the proposal of selected start-ups to the ministry for funding.(For more information visit to w.Wyv.cirQotrabi*Egm On these What We Do+ Incubation Programmes Pre-Seed/ Seed Stage Funding Programs).

- **What will be the venue of the trainínq proqram?**

Venue for training (Online/Offline mode) will be

भा.कृ.अनु.प.- केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था (कृ.अनु.शि.वि., कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार) एडेनवाला रोड, पोस्ट बैग नंबर-16640, माटुंगा (पूर्व), मुंबई- 400 019 आरकेवीवाइ-रफ्तार-एग्री बिजिनेस इन्क्यूबेटर (CIRCOT R-ABI)
(Agri Business Incubator under RKVY-RAFTAAR, MoA & amp; FW, GoI)

**भारतीय ॲग्री इनोव्हेटर्स व स्टार्टअप्सकडून अर्ज आमंत्रित करण्यात येत आहेत**

सिरकॉट-आरकेवीवाइ-रफ्तार-एग्री बिजिनेस इन्क्यूबेटरकडून देशाच्या कृषी उन्नतीसाठी नूतन कल्पना मांडणाऱ्या विद्यार्थी/ नव उद्योजक/ स्टार्टअप्सकडून आयडिया प्री-स्टेज फंडिंग प्रोग्राम (उदय) अंतर्गत रु. 5 लाख प्रती स्टार्टअप योजना व तयार किमान व्यवहार्य उत्पादन (एमवीपी) असल्यास सीड स्टेज फंडिंग प्रोग्राम (अंकुर) अंतर्गत रु. 25 लाख प्रती स्टार्टअप योजनेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. निवडलेल्या अर्जदारांनी 2 महिन्यांचा कृषी उद्योजकता अभिमुखता कार्यक्रम (एओपी) यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना/ प्रोटोटाइप/ प्रणालीच्या विकासासाठी अनुदान दिले जाईल. अर्ज करण्याची अंतिम तारीख : **30-09-2023**

अधिक माहितीसाठी आणि अर्ज प्रस्तुत करण्यासाठी **www.circotrabi.com ;**
**Email : circotrabi@gmail.com**

s/d
संचालक

ICAR-CIRCOT, Mumbai.

- **Is the programme only for the people with a background in aqriculture?**

Applicants from any apply but his/her agriculture and allied academic background can project should be under sector.

- **What are the criteria to get selected for grant in aid?**

Start-ups showing some growth two months and meeting the selection by RIC of R-ABI will bein a period parameters selected.

- **Is it compulsory for the people who have attended such trainings many times in the past to attend the two months training?**

Yes, attending two months training is compulsory.

- **Will an applicant receive 100% of project cost as a financial aid?**

Under Agripreneurship Orientation Programme, selected applicants will receive 90o/o of theproject cost in financial aid (maximum ?5 lakhs),while under Start-up Agri-Business Incubation Programme selected applicants will receive B5o/oof the project cost in financial aid (maximum ? 25lakhs).

- **What will be the phases of fund disbursement?**

For seed stage, fund will be disbursed to recommended start-ups in three tranches of 40o/o, 40o/o & 20% and for pre-seed stage, fund will be disbursed in two tranches of 600/o and 40o/o of sanctioned amount from Ministry.

- **I have already availed the grant-in-aid for the firm in the past. Am I eligible to apply?**

No. You cannot avail the grant-in-aid if you have received the grant-in-aid from any government body. However, if you have received prize money such as 'Elevate' grant, then you may apply.

- If an individual hasapplied for the pre-seed stage grant-in-aid in one cohort, can he apply for seed stage funding in the next cohort?

Yes, provided the pre-seed incubate achieves all the milestones and exhausts the previously released pre-seed grant money.

Application for UDAY and ANKUR - Agri-Business Incubation & Funding programs Under CIRCOT RKVY- RAFTAAR – ABI (8th COHORT)

CIRCOT-R-ABI, is implementing two programs; Uday (Pre-seed stage funding) and Ankur (Seed stage funding) under Rashtriya Krishi Vikas Yojana - Remunerative Approaches for Agriculture and Allied Sector Rejuvenation (RKVY-RAFTAAR) Scheme of Ministry of Agriculture and Farmers Welfare, Government of India. Through this scheme, a Grant-in aid is provided to develop and /or scale up innovative agri-business ideas of potential start-ups. Selected Agri-Innovators with commercially viable Innovative idea in Agri & allied sector will get Grant-in-aid up to Rs. 5 lakhs in Uday (Pre-seed stage funding) for the realization of their idea into a product/prototype and Agri-start-ups with market-ready Minimum Viable Products (MVP) will get grant-in-aid up to Rs. 25 lakhs in Ankur (Seed stage funding) to support commercialization of their MVP. The selected incubates for both the programs will get nurtured with technical mentorship, networking support, need-based business support for realizing their business dream.

## ELIGIBILITY CRITERIA:

a) Applicant shall be a citizen of India

b) Applicant shall pursue his/her entrepreneurial aspiration on full time basis after selection in this program.

I have read and understood the eligibility criteria and wish to apply for;

Pre Seed Stage Funding Program (Uday),

Seed Stage Funding Program (Ankur)

# E - INVOICING APPLICABLE FROM 1st AUGUST 2023




E-invoicing has become a significant aspect of GST compliance in India. With the latest notification, there are new rules for E-invoicing applicability from August 2023. This article provides a comprehensive overview of the updated regulations, including the threshold limit, requirements, and exemptions.

As per the Notification No 10/2023 dated 10th May 2023 the threshold limit of E-invoicing turnover has been reduced to 5 crores from 01st August 2023.

Thus, registered persons whose Aggregate turnover in any preceding Financial Year from 2017-18 onwards is more than 5crores then E-invoicing is mandatory from 01st August 2023.

If in any preceding year from FY 2017-18 (From 1.17.17) onwards the Aggregate Turnover exceeds 5 crores then E-invoicing is mandatory

**Below are set of Examples :-**

| Year | Case 1<br>Aggregate T/O in crores | Case 2<br>Aggregate T/O in crores | Case 3<br>Aggregate T/O in cro |
|---|---|---|---|
| 2017-18 | 3 | 1.75 | 2 |
| 2018-19 | 4.5 | 3.50 | 3.5 |
| 2019-20 | 5.5 | 4.25 | 4.75 |
| 2020-21 | 1.5 | 2.50 | 2.25 |
| 2021-22 | 2.5 | 4.25 | 3.50 |
| 2022-23 | 3.75 | 6.50 | 4.75 |
| 2023-24 | 4.5 | 4.75 | 5.75 |
| E-invoice from Aug 23 | Applicable | Applicable | Not Applicable |
| Reasons | In the preceding year 2019-20 the Aggregate T/O exceeds 5crores.<br>Thus, E-invoicing is applicable from Aug 23 | In the preceding year 2022-23 the Aggregate T/O exceeds 5crores.<br>Thus, E-invoicing is applicable from Aug 23 | Currently for Aug<br>invoicing is not appli<br>limit of 5 crores has<br>any of the preceding<br>invoicing would be<br>April 2024 onwards |

**What is Aggregate Turnover as per GST?**

As per section 2(6) of the CGST/SGST Act "Aggregate turnover" includes the aggregate value of:

(i) all taxable supplies,
(ii) all exempt supplies,
(iii) exports of goods and/or service, and,
(iv) all inter-state supplies of a person having the same PAN.

Hence registered person with same PAN having multiple GSTINs must include all the Taxable, Exempt, Export turnover incurred under various GSTINs under the same PAN. Aggregate turnover is calculated as per PAN and not according to individual GSTIN.

The above shall be computed on all India basis and excludes taxes charged under the CGST Act, SGST Act, UTGST Act, and the IGST Act.

Aggregate turnover shall include all supplies made by the Taxable person, whether on his own account or made on behalf of all his principals.

Aggregate turnover does not include: –

Value of Inward supplies on which tax is levied on reverse charge basis The value of goods after completion of job work is not includible in the turnover of the job-worker. It will be treated as supply of goods by the principal and will accordingly be includible in the turnover of the Principal.

? Although exempt supply is to be included in Aggregate turnover calculation, but no e-invoicing is to be done for exempt supply. As for nil rated and wholly exempt supplies bill of supply is issued and not invoice Supplies and Documents:-

Documents and supplies for which E-invoicing is applicable, if Registered Persons Aggregate turnover on the basis of PAN in any preceding Financial Year from 2017-18(1.7.17) onwards is more than 5crores

**1. Documents: –**

Invoices

Debit Notes

Credit Notes

**2. Supplies: –**

**B2B Supplies: -Supplies made to registered persons having GSTIN**

This includes supplies made to registered persons under the same Pan having different GSTIN

Thus, supplies made to unregistered persons i.e., B2C supplies are not covered for E-invoicing

**SEZ Supplies: -Supplies made to SEZ units with or without GST Paid**

**Export Supplies: -Export Supplies made with or without IGST Payment**

**Deemed Exports**

**Supplies made to Government Departments: –**

As per the recommendations made in the 50th GST Council Meeting and Circular No 198/10/2023 issued on 17th July 2023 clarified that supplies made to Government Departments or establishments/ Government agencies/ local authorities/ PSUs, etc. under rule 48(4) of CGST Rules whose turnover exceeds the prescribed threshold for generation of e-invoicing is required to issue e-invoices even if their GST Registration is solely for the purpose of Tax at source deducted as per provisions of section 51 of the Central Goods and Services Tax Act, 2017 for such supplies made to Government.

**Supplies under RCM**

If a registered person whose outward supplies attract Reverse Charge mechanism u/s 9(3), e-invoicing is mandatory E-invoicing not applicable to which registered type of persons?

As per Notification no 13/2020 dated 21st March, 2020 registered persons referred in sub-rules (2), (3), (4) and (4A) of rule 54 are exempted from E-invoicing requirements.

**1. Banking and Insurance Sector-Rule 54(2)**

Where the supplier of taxable service is an: –

Insurer or

A Banking company or A Financial Institution, including Non-Banking Financial Company

**2. Goods Transport Agency-Rule 54(3)**

Where the supplier of taxable service is a goods transport agency supplying services in relation to transportation of goods by road in a goods carriage.

**3. Passenger Transport Service Supplier-Rule 54(4)**

Where the supplier of taxable service is supplying passenger transportation service

**4. Admission of exhibition of cinematograph films in Multiplex-Rule 54(4A)**

A registered person supplying services by way of admission to exhibition of cinematograph films in multiplex screens

**5. SEZ Unit**

As per **Notification No 61/2020 dated 30th July 2020** only SEZ Units are exempted from E-invoicing, not SEZ

**Developers**

As per the SPECIAL ECONOMIC ZONES ACT, 2005, SEZ Developer means a person who, or a State

Government which, has been granted by the Central Government a letter of approval under sub-section (10) of section 3 and includes an Authority and a Co-Developer (the Developer or Co-Developer shall have at least twenty-six percent of the equity in the entity) to create business, residential or recreational facilities in a Special Economic Zone in case such development is proposed to be carried out through a separate entity or a special purpose vehicle being a company formed and registered under the Companies Act, 1956 (1 of 1956).

SEZ units are the units set up for the manufacture of goods or rendering of services.

**Conclusion:** The new E-invoicing applicability update starting from 1st August 2023 brings important changes for registered persons with an aggregate turnover exceeding 5 crores in any preceding financial year. By understanding the revised threshold limit and regulations, businesses can ensure timely compliance with Einvoicing requirements.




# महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा (मैत्री) अध्यादेश - २०२३ लागू

**मुंबई :** राज्यात उद्योग स्थापन करण्यासाठी आणि कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानगी संदर्भातील सेवा पुरविणे, व्यापार व गुंतवणूक याबाबतीत स्पर्धात्मकतेत वाढ करणे, व्यवसाय सुलभतेची निश्चिती करणे, गुंतवणुकीसाठी आवश्यक असलेली माहिती पुरविण्यासाठी पोर्टल विकसित करणे आणि त्याच्या देखभालीसाठी प्रभावी एक खिडकी प्रणाली तयार करणे आदी उद्देशपूर्तीसाठी महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा (मैत्री) अध्यादेश –२०२३ लागू करण्यात आला आहे. राज्यपाल रमेश बैस यांच्या स्वाक्षरीने हा अध्यादेश लागू करण्यात आला आहे. (Maharashtra Industry, Trade and Investment Facilitation (Friendship) Ordinance - 2023 Issued)

उद्योग व सेवा क्षेत्रांमध्ये जलद गतीने होणारी वाढ व नवीन उपक्रम यामुळे संपूर्ण व्यवसाय परिसंस्थेतील शासनाची भूमिका बदललेली आहे. शासनाने केवळ नियंत्रकाचीच नव्हे तर, व्यवसाय परिसंस्था विकासकाची भूमिका देखील बजावणे अपेक्षित आहे. राज्यामध्ये गुंतवणूक करणे सुलभ होण्याच्या दृष्टीने गुंतवणूकदारांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी सन २०१४ मध्ये महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा कक्ष (मैत्री) उभारला आहे. त्याचे एक खिडकी प्रणाली म्हणून रूपांतर केले आहे. प्रभावीपणे कार्य करण्याच्या दृष्टीने, मैत्रीयास अतिरिक्त अधिकार प्रदान करणे गरजेचे आहे. राज्यात गुंतवणूकदार व उद्योजक– प्राधान्यकारी वातावरणाची निर्मिती केल्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यासोबतच देशांतर्गत व परकीय गुंतवणुकीसाठी राज्य सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनण्याची निश्चिती, विविध क्षेत्रांमध्ये नोकऱ्या निर्माण करण्यास देखील मदत होणार आहे. होईल. विविध कायद्यान्वये उद्योग स्थापन करण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानगी, मान्यता, मंजुरी व ना–हरकत प्रमाणपत्रे देण्याच्या संबंधातील सेवा पुरवण्यासाठी प्रभावी एक खिडकी प्रणाली निर्माण करण्याच्या प्रयोजनाचा उद्देश या अधिनियमामुळे साध्य होण्यास मदत होणार आहे.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय एक खिडकी प्रणाली(एनएसडब्ल्यूएस) आणि राज्य पोर्टल्स यांमधील प्रभावी दुव्यांची सुनिश्चिती करून, त्याद्वारे या संबंधातील केंद्र सरकारचे आणि राज्य शासनाचे प्रयत्न सफल होण्यास मैत्रीमदत करील. प्रभावी एक खिडकी प्रणाली निर्माण करण्याच्या प्रयोजनासाठी कायदा अधिनियमित करण्यासाठी एक तत्सम विधेयक, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ म्हणून महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये मांडण्यात आले होते. ते ३ मार्च २०२३ रोजी संमत करण्यात आले होते आणि त्यानंतर महाराष्ट्र विधान परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आले. ते १३ मार्च २०२३ रोजी विधान परिषदेमधून परत घेतले. त्यानुसार, आवश्यक ते बदल करण्यात आले. मैत्री हे, महाराष्ट्र राज्यातील एक खिडकी प्रणालीसाठी नोडल अभिकरण असेल, संबंधित कायद्यान्वये आवश्यक असलेल्या कोणत्याही परवानगीकरिता एक खिडकी प्रणालीमार्फत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अर्ज करण्याची तरतूद, मैत्रीच्या कामाचे पर्यवेक्षण करणे, सक्षम प्राधिकाऱ्यांनी विनिर्दिष्ट काल मर्यादेत निकालात न काढलेल्या अर्जांवर निर्णय घेणे व ते निकालात काढणे, अर्जदारांच्या तक्रारींचे निवारण करणे, इत्यादींकरिता, अध्यक्ष म्हणून, विकास आयुक्त (उद्योग) यांचा समावेश असलेली अधिकारप्रदत्त समिती गठित करण्याकरिता तरतूद करणे, अधिकारप्रदत्त समितीने निर्दिष्ट केलेल्या प्रस्तावांची तपासणी करणे, व्यवसाय करणे सुलभ होण्याच्या संबंधातील कोणत्याही मुद्यांबाबत निदेश देणे, संबंधित प्राधिकाऱ्यांना धोरणात्मक शिफारशी करणे, इत्यादींसाठी अध्यक्ष म्हणून सचिव (उद्योग) यांचा समावेश असलेली पर्यवेक्षकीय समिती गठित करण्याकरिता तरतूद करणे, सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारे संबंधित कायद्यांच्या तरतुदीखालील तपासण्या, व्यवहार्य असेल तेथवर यादृच्छिक निवडीच्या आधारे संयुक्तपणे करण्यात येतील याची तरतूद करणे, राज्यामध्ये उद्योग उभारण्यासाठी उद्योजकांना किंवा गुंतवणूकदारांना सहाय्य करण्याकरिता सर्वसमावेशक ऑनलाईन विझार्ड मॉड्यूल संकल्पचित्रित व विकसित करण्यासाठी तरतूद करणे, मैत्रीमार्फत राज्यामध्ये व्यवसाय उभारण्यासाठी इच्छुक असणाऱ्या सर्व गुंतवणूकदार व उद्योजकांसाठी सुरळीत एक खिडकी निपटारा प्रणाली उपलब्ध करून देणे त्याद्वारे, व्यवसाय सुलभीकरण ही या अध्यादेशाची वैशिष्ट्ये आहेत.

# पारंपरिक कलाकौशल्याचे काम करणाऱ्यांना लाभ देण्यासाठी पंतप्रधानांनी जाहीर केली ‘विश्वकर्मा’ योजना



**१३००० ते १५००० कोटी रुपयांच्या प्रारंभिक तरतुदीने योजना सुरू होणार**

**१३.५ कोटी गरीब देशवासी आणि महिला गरिबीच्या शृंखलेतून मुक्त झाले आहेत आणि नवमध्यम वर्गात दाखल झाले आहेत**

**नवी दिल्ली :** ७७व्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येत्या काही दिवसात ‘विश्वकर्मा योजना’ सुरू करण्याची घोषणा केली पारंपरिक कलाकौशल्याचे काम करणाऱ्यांना लाभ देण्याचा या योजनेचा उद्देश आहे.

येत्या काही दिवसात, आम्ही विश्वकर्मा जयंतीला पारपंरिक कलाकौशल्याचे काम करणाऱ्यांना विशेषतः ओबीसी समुदायातील कारागीरांना लाभ देण्यासाठी ही योजना सुरू करत आहोत विणकर, सोनार, लोहार, लॉन्ड्री कामगार, नाभिक आणि अशा कुटुंबांचे विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून सक्षमीकरण करण्यात येईल. १३ ते १५ हजार कोटी रुपयांच्या प्रारंभिक तरतुदीने ही योजना सुरू होईल. असे पंतप्रधान म्हणाले. त्यापूर्वी आपल्या भाषणात मोदी यांनी दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकार करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. ते म्हणाले, या प्रयत्नांचा परिणाम म्हणून पहिल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात १३.५ कोटी गरीब देशवासी आणि महिला गरिबीच्या शृंखलेतून मुक्त झाले आहेत आणि नवमध्यम वर्गात दाखल झाले आहेत. पंतप्रधानांनी १३.५ कोटी लोकांना गरिबीच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी हात देणाऱ्या विविध योजनांविषयी माहिती दिली. यामध्ये प्रामुख्याने पीएम स्वनिधीच्या माध्यमातून फेरीवाल्यांना ५०,००० कोटी रुपये आणि पीएम किसान सम्मान निधीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट २.५ लाख कोटी रुपये जमा करण्याचा समावेश होता.

## विश्वकर्मा योजनेअंतर्गत ५% व्याजासह १ लाख रुपयांपर्यंत मिळणार कर्ज

Vishwakarma Scheme : ७७व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना कारागीरांसाठी 'विश्वकर्मा योजना' जाहीर केली. मोदी मंत्रिमंडळाने बुधवारी या योजनेला मंजुरी दिली आहे. ही योजना विशिष्ट शैलीतील कुशल कामगारांसाठी असेल.

तिचे पूर्ण नाव PM² 'विश्वकर्मा कौशल सन्मान योजना' किंवा 'PM² विकास योजना' (PM² विश्वकर्मा कौशल सन्मान योजना – PM² VIKS) आहे. या योजनेचे बजेट २०२३ च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात ठेवण्यात आले होते.

'विश्वकर्मा योजने'मध्ये १३ ते १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. विश्वकर्मा योजनेंतर्गत कमाल ५% व्याजासह १ लाख रुपये कर्ज दिले जाणार आहे अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. १७ सप्टेंबर २०२३ रोजी विश्वकर्मा पूजेच्या निमित्ताने 'विश्वकर्मा योजना' सुरू करण्यात येणार आहे. हाच दिवस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही वाढदिवस आहे. 'विश्वकर्मा योजने'चा उद्देश कौशल्य प्रशिक्षण, तंत्रज्ञान आणि आर्थिक सहाय्य देऊन देशभरातील कारागीर आणि कारागीरांच्या क्षमता वाढवणे हा आहे. या योजनेअंतर्गत कुशल कारागिरांना एमएसएमईशी जोडले जाईल, जेणेकरून त्यांना चांगली बाजारपेठ मिळू शकेल.

पीएम विश्वकर्मा योजनेंतर्गत, कारागीर यांना पीएम विश्वकर्मा प्रमाणपत्रे, ओळखपत्र, क्रेडिट सपोर्ट १ लाख (पहिल्या टप्प्यात) आणि २ लाख (दुसऱ्या टप्प्यात) ५% सवलतीच्या व्याजदराद्वारे मान्यता दिली जाईल.'' केंद्राने एका निवेदनात म्हटले आहे. पीएम विश्वकर्मा अंतर्गत पहिल्या टप्प्यात समाविष्ट असलेल्यांमध्ये सुतार, बोट बनवणारे, लोहार, कुलूप बनवणारे, सोनार, कुंभार, शिल्पकार आणि गवंडी यांचा समावेश आहे.

### योजनेचा लाभ कोणाला मिळणार?

सुतार, सोनार, शिल्पकार आणि कुंभार या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ मिळणार आहे. याद्वारे कारागिरांच्या उत्पादनांचा आणि सेवांचा दर्जा वाढविण्याचा तसेच त्यांना देशांतर्गत बाजारपेठ आणि जागतिक बाजारपेठेशी जोडण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

# राज्य सरकारकडून 'मायटेक्स एक्स्पो २०२३' सर्वोतोपरी सहकार्य : पालकमंत्री दादाजी भुसे

## उत्तर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी 'मायटेक्स एक्स्पो २०२३' ट्रेड फेअर ठरणार महत्वपूर्ण : ललित गांधी

### 'मायटेक्स एक्स्पो २०२३' ट्रेड फेअरच्या माहितीपत्रकाचे अनावरण




**'मायटेक्स एक्स्पो २०२३' ट्रेड फेअरच्या माहितीपत्रकाचे अनावरण प्रसंगी मार्गदर्शन करताना नाशिकचे पालकमंत्री व राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री दादाजी भुसे व्यासपीठावर उपस्थित अध्यक्ष महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे, प्रदर्शनाचे कन्व्हेनर सचिन शहा, को-कन्व्हेनर व्हिनस वाणी, मिलिंद राजपूत, निमा अध्यक्ष धनंजय बेळे.**

**नाशिक :** उत्तर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी 'मायटेक्स एक्स्पो २०२३' या ट्रेड फेअर महत्वपूर्ण ठरणार असून यामध्ये विविध १५ हून अधिक क्षेत्रातील ३०० स्टॉलचा सहभाग असेल. यामध्ये व्यापारी उद्योजकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. 'मायटेक्स एक्स्पो २०२३' या ट्रेड फेअरच्या माहिती पत्रकाच्या अनावरण प्रसंगी ५० स्टॉल बुक झाले असून प्रतिसाद चांगला मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान राज्य सरकारकडून 'मायटेक्स एक्स्पो २०२३' या ट्रेड फेअरसाठी सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी या कार्यक्रमाप्रसंगी दिले.




उत्तर महाराष्ट्र विभागाच्या व्यापार, उद्योगाला प्रोत्साहन व चालना देण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरतर्फे येत्या ६ ते ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी आंतरराष्ट्रीय 'मायटेक्स एक्स्पो २०२३' या ट्रेड फेअरचे आयोजन नाशिकमध्ये डोंगरे वस्तीगृह मैदान येथे करण्यात येत आहे.

त्यानिमित्त 'मायटेक्स एक्स्पो ट्रेड फेअरच्या' माहितीपत्रकाचे अनावरण नाशिकचे पालकमंत्री व राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या प्रमुख उपस्थित झाले. त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे, प्रदर्शनाचे कन्व्हेनर सचिन शहा, को-कन्व्हेनर व्हिनस वाणी, मिलिंद राजपूत, निमा अध्यक्ष धनंजय बेळे उपस्थित होते.

उत्तर महाराष्ट्रातील व्यापार उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगाला राज्य व देश, जागतिक पातळीवर प्रोत्साहन देण्याचे काम होणार



'मायटेक्स एक्स्पो २०२३' ट्रेड फेअरच्या माहितीपत्रकाचे अनावरण प्रसंगी मार्गदर्शन करताना अध्यक्ष महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, व्यासपीठावर उपस्थित नाशिकचे पालकमंत्री व राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री दादाजी भुसे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा व उपस्थित मान्यवर.

असून या माध्यमातून नवीन व्यापार उद्योगांच्या संधी प्राप्त होणार असल्याचे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे म्हणाले, नाशिकमध्ये होणाऱ्या 'मायटेक्स एक्स्पो २०२३' या ट्रेड फेअरच्या निमित्ताने उत्तर महाराष्ट्रात चांगली गुंतवणूक आल्यास नवीन प्रकल्प तयार होतील. त्यातून व्यापार उद्योगाला गती व चालना मिळेल. राज्याच्या विकासात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची भूमिका नेहमीच अग्रेसर राहिली आहे. या ट्रेड फेअरच्या माध्यमातून राज्यातील व देशातील व्यापारी उद्योजक नाशिकमध्ये येऊन व्यापार उद्योग करतील, त्यातून उत्तर महाराष्ट्राचा व्यापार उद्योग समृद्ध होईल. राज्य सरकारकडून या ट्रेड फेअरच्या यशस्वीतेसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन 'मायटेक्स एक्स्पो'ला शुभेच्छा दिल्या.

वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा यांनी प्रास्तविक केले. ते म्हणाले, महाराष्ट्र चेंबरतर्फे स्वातंत्र्यपूर्व काळापासून राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले आहे. उत्तर महाराष्ट्राच्या विकासासाठी नाशिक येथे शाखा कार्यालय सुरू करून या कार्यालयातर्फे उत्तर महाराष्ट्राच्या व्यापार, उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगांच्या विकासात महाराष्ट्र चेंबरने

## काय असेल 'एक्स्पोत'

या एक्सपोमध्ये व्यापार, उद्योग, कृषी, उद्योग, बांधकाम, आयटी, शिक्षण ऑटोमोबाईल, गृहप्रकल्प, सोलार यासह विविध १५ हून अधिक क्षेत्रातील ३०० स्टॉल या प्रदर्शनात असतील. चार दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात विविध महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चासत्र होत आहेत. एक्स्पो दरम्यान भारतातील इतर राज्यात कार्यरत असलेल्या विविध चेंबर्स, संस्था, संघटना यांचे प्रतिनिधी तसेच इतर देशातील कॉन्सुलेट यांना निमंत्रित करून उत्तर महाराष्ट्र विभागाचा व्यापार उद्योग वाढावा, यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. बायर –सेलर मीट, व्यापार सामंजस्य करार, जॉब फेअर, कौशल्य विकास, असे विविध सेमिनारचे आयोजन केले जाणार आहे. तसेच सरकारच्या विविध योजनांची माहिती या प्रदर्शनात दिली जाणार आहे.






**‘मायटेक्स एक्स्पो २०२३’ ट्रेड फेअरच्या माहितीपत्रकाचे अनावरण नाशिकचे पालकमंत्री व राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या प्रमुख उपस्थित झाले. या वेळी व्यासपीठावर वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे, प्रदर्शनाचे कन्व्हेनर सचिन शहा, को-कन्व्हेनर व्हिनस वाणी, मिलिंद राजपूत, निमा अध्यक्ष धनंजय बेळे.**

महत्त्वाची भूमिका बजावली आहे. राज्यासह उत्तर महाराष्ट्रात व्यापार उद्योग क्षेत्राच्या विविध व्यापारी उद्योजकांच्या संस्था उभारल्या आहेत. उत्तर महाराष्ट्र शाखा सुवर्णमहोत्सव वर्षपूर्ती साजरी करत असून त्यानिमित्त विविध उपक्रम आयोजित केले आहेत.

उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी ‘मायटेक्स एक्स्पो २०२३’ ट्रेड फेअरच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्रातील व्यापार उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगाला राज्य व देश, जागतिक पातळीवर प्रोत्साहन मिळणार आहे. त्यासह या माध्यमातून नवीन व्यापार उद्योगांच्या संधी प्राप्त होणार असल्याचे सांगितले.

दरम्यान या वेळी ‘मायटेक्स एक्स्पो’ मध्ये सहभागी होणाऱ्या स्टॉल धारकांचा सत्कार पालकमंत्री दादाजी भुसे आणि महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते करण्यात आला. ट्रेड फेअर यशस्वीतेसाठी विविध समित्याचे चेअरमन, को-चेअरमन यांना अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

याप्रसंगी व्यापारी, औद्योगीक संघटनांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. शाखा चेअरमन संजय सोनवणे यांनी स्वागत केले. ट्रेड फेअरचे को-कन्व्हेनर मिलिंद राजपूत यांनी सूत्रसंचालन केले. ट्रेड फेअरचे को-कन्व्हेनर सचिन शहा यांनी आभार मानले. दरम्यान महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग, शिक्षण, ऑटोमोबाईल, कृषी प्रक्रिया उद्योग, गृह प्रकल्प, सोलर यासह विविध क्षेत्रातील व्यापारी उद्योजकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

## प्रदर्शनासाठी परिश्रम

प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र चेंबरच्या अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समिती कार्यरत झाल्या आहेत. वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, उपाध्यक्ष नितीन बंग, शाखा चेअरमन संजय सोनवणे, प्रदर्शनाचे कन्व्हेनर सचिन शहा, को-कन्व्हेनर व्हिनस वाणी, मिलिंद राजपूत, संदिप भंडारी यांच्यासह विविध समितीचे चेअरमन, को-चेअरमन, सदस्य, व कार्यकारणी सदस्य, मायटेक्स चे विविध समितीचे चेअरमन व सदस्य परिश्रम घेत आहेत.



# जालना येथे लवकरच ‘ड्रायपोर्ट’ होणार : नाम. रावसाहेब दानवे

## मराठवाडा व्यापारी परिषद उत्साहात संपन्न



**मराठवाडा व्यापारी परिषदेचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, माजी अध्यक्ष मानसिंग पवार, मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष आदेशपाल सिंग छाबडा यांच्या हस्ते उद्घाटन**

**जालना :** जालना येथे लवकरच ड्रायपोर्ट होणार आहे. जालना आणि औरंगाबाद येथे दोन मोठ्या रेल्वे स्टेशनच्या नूतनीकरणासाठी अनुक्रमे १८२ आणि ३०० कोटी रुपये मंजूर केल्याचे केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी सांगितले.

मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्स च्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त जालना जिल्हा व्यापारी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने जालना येथे मराठवाडा व्यापारी परिषद संपन्न झाली. या प्रसंगी व्यापारी परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री, अँण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंग पवार, मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे अध्यक्ष आदेशपाल सिंग छाबडा यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले, जालना रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणासाठी १८२ कोटींचा निधी मंजूर केला आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाप्रमाणे येथे सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या शिवाय देशातील एक हजार ३०९ रेल्वे स्थानकांच्या नूतनीकरणाला मंजुरी दिली आहे. त्यांपैकी ५०८ रेल्वे स्थानक नूतनीकरणाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. यामध्ये जालना रेल्वे स्थानकाचा समावेश असून १८२ कोटीचा निधी उपलब्ध करून दिला आहे. पुढील ५० वर्षांचा विचार करून हे रेल्वे स्थानक निर्माण करण्यात येत आहे. रेल्वेच्या दोन्ही बाजूने ये-जा करण्याची



**केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचा सत्कार करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, माजी अध्यक्ष मानसिंग पवार, जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी सचिव शाम लोया.**



**महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार करतांना जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी, सचिव शाम लोया, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष तनसुख झांबड व पदाधिकारी.**





**भव्य मराठवाडा व्यापारी परिषदेत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष  ललित गांधी यांचे जालना येथे ढोल ताशांच्या गजराच्या वाद्यांनी मिरवणुकीद्वारे जल्लोषात स्वागत करण्यात आले. दुसऱ्या छायाचित्रात मराठवाडा व्यापारी परिषदचे उद्‌घाटन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री, अँण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, माजी अध्यक्ष मानसिंग पवार, मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष आदेशपालसिंग छाबडा यांच्या हस्ते करण्यात आले. जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष तनसुख झाबड, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीजचे माजी अध्यक्ष शिवप्रसाद जाजू, शाम लोया, सुभाष देवीदान आदींसह मान्यवर उपस्थित होते.**

सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाप्रमाणे सर्व सुविधा असणार आहेत. येथे मॉलची उभारणी केली जाणार असून त्यात गाळे भाडेतत्त्वावर घेऊन अनेकांना व्यवसाय सुरू करता येणार आहे. यामुळे शहरासह पर्यटनाचा विकास होईल. देशातले तिसरे आयसीटी महाविद्यालय जालना येथे आणल्याचेही त्यांनी सांगितले. व्यापारी व उद्योजकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी केंद्र व राज्य सरकार तत्पर असल्याचे त्यांनी सांगितले

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी मार्गदर्शन करताना म्हणाले, जालना येथे सीड आणि स्टील हे निर्माण होते. जालना मराठवाड्यातील प्रमुख व्यापारी केंद्र असून त्याला



**मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या २६ या वर्धापन दिनानिमित्त जालना जिल्हा व्यापारी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मराठवाडा व्यापारी परिषदेत मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी. उपस्थितात मराठवाडा विभागातील व्यापारी, औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी.**



**माजी मंत्री आमदार राजेश टोपे यांचा सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी व अन्य पदाधिकारी.**

'सोन्याचा पाळणा' असेही म्हटले जाते. व्यापार उद्योगांचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्यस्तरावर महाराष्ट्र चेंबर शिखर संस्था म्हणून नेहमीच सकारात्मक प्रयत्न करत आहे. त्याचाच परिणाम म्हणून प्लास्टिक बंदीतून मुक्तता व कोरोना काळातील प्रलंबित असलेले २३०० कोटी रुपयांचे अनुदान मिळवून देण्यात महाराष्ट्र चेंबरने यश मिळवले आहे. केंद्र सरकारने जीएसटी कर लागू करताना साधा सरळ कर असेल असे सांगितले होते. तसेच दुसरा कर लागणार नाही अशी शाश्वती दिली होती, मात्र व्यवसाय कर आजही आहे हा कर महाराष्ट्रातच असून कराची टांगती तलवार व्यापारी उद्योजकांवर आहे. व्यवसाय कर रद्द करण्यासाठी चेंबरचे प्रयत्न सुरू आहेत. जीएसटीच्या संदर्भातील २०१७-१८ च्या नोटीसा जीएसटी विभागाकडून व्यापाऱ्यांना दिल्या जात आहेत. तसेच जीएसटी खरेदी केल्यानंतर ग्राहकाने जीएसटी भरल्यानंतर पुन्हा माल देणाऱ्याने जीएसटी न भरल्यास ग्राहकाकडून जीएसटी कर वसूल करण्याची पद्धत चुकीची असून ही पद्धत रद्द करण्याची मागणी केली. केंद्र सरकारने 'जनविश्वास बिल' आणले असून ते मंजूर करण्यात आले आहे. या 'जनविश्वास बिला'च्या माध्यमातून ब्रिटिशांनी तयार केलेल्या १४२ तरतुदी रद्द केल्या आहेत. त्यामुळे व्यापाऱ्यांचा त्रास निश्चितच कमी होणार आहे. तशाच प्रकारे जीएसटी, आयकर मधील तरतुदी बदल करण्याची गरज असल्याचे सांगितले.

## राज्यात ट्रेड बोर्डची स्थापना करा

शहरांमधील व्यापार हा ई-कॉमर्स मुळे संपुष्टात येत आहे, व्यापाऱ्यांची पुढची पिढी त्यामुळे व्यापारात येण्यास तयार नाही. ई-कॉमर्स प्रणालीमध्ये व्यापाऱ्यांना वेगळे स्थान देण्याची गरज आहे. केंद्र सरकारने ट्रेड नॅशनल बोर्ड स्थापन केले आहे. त्याच धर्तीवर राज्य सरकारने ही राज्यात ट्रेड बोर्डची स्थापना करावी, यासाठी महाराष्ट्र चेंबरने मागणी केली असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

## व्यापारी बंधूनो अपडेट व्हा : ललित गांधी

बदलत्या काळानुसार व्यापाऱ्यांनी ही अत्याधुनिक तंत्रज्ञान शिकून आपल्या व्यवसायात त्याचा वापर केला पाहिजे. ई-कॉमर्स कंपन्यांना तोंड द्यायचे असल्यास सोशल मीडिया, मार्केटिंग याचा प्रामुख्याने वापर करून व्यापार वृद्धीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. महाराष्ट्र चेंबर व्यापारी व उद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी जसे प्रयत्नशील आहेत तसेच राज्यातील व्यापार उद्योगाच्या वाढीसाठी ही विविध उपक्रम राबविले जात असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंह पवार म्हणाले, एकेकाळी जागतिक अर्थव्यवस्था भारताच्या हाती होती. आज अर्थव्यवस्थेमध्ये जगातील पहिल्या पाच देशांत भारताचा समावेश आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे देशाच्या अर्थ व्यवस्थेत व्यापाऱ्यांचे मोठे योगदान आहे. स्वातंत्र्यापूर्वी व्यापार व उद्योग क्षेत्रात अधोगती झाली होती. भारतीय अर्थव्यवस्था ही शेती उत्पादनावरच अवलंबून होती. १९९०-९१ च्या काळात अर्थमंत्री म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांनी नवीन आर्थिक धोरण अंमलात आणून देशाची अर्थव्यवस्था बळकटीसाठी पुढाकार घेतला. डॉ. सिंग यांच्या काळात देशाचा आर्थिक दर हा १० टक्के होता. देशाच्या अर्थव्यवस्थेत व्यापारी वर्ग मोठे योगदान देत आहे. जीएसटी करातून प्रत्येक महिन्यात देशभरात १ लाख ६५ हजार कोटी सरकारच्या तिजोरीत जमा होत आहेत. आज भारतीय अर्थ व्यवस्था ही जगातील पहिल्या पाच देशामध्ये आहे. भविष्यात जगात तिसऱ्या या क्रमांकावर राहील. देशातील व्यापारी वर्गच हा रोजगार निर्मितीचा प्रश्न सोडवेल.

माजी मंत्री आमदार राजेश टोपे यांनीही मार्गदर्शन केले. जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी यांनी जालना जिल्हा व मराठवाडा विभागातील विविध अडचणी मांडल्या. महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंग पवार यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचा आढावा घेतला. जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे सचिव शाम लोह संजय दाड, सौ. विजया बोरा, पवन ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवप्रसाद जाजू यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष तनसुख झांबड, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे माजी अध्यक्ष शिवप्रसाद जाजू,

महाराष्ट्र चेंबरच्या तज्ज्ञ समितीचे चेअरमन घनशाम गोयल, शाम लोया, सुभाष देवीदान, 'सफल सीड्स' चे कमल झुनझुनवाला, महाराष्ट्र चेंबरचे माजी उपाध्यक्ष सत्यनारायणजी लाहोटी, एमसीटीसीचे माजी अध्यक्ष प्रफुल मालानी, रूपम स्टीलचे सुनील अग्रवाल, जितेंद्र बंसल, एमसीटीसीचे माजी अध्यक्ष कल्याणराव वरकसे, जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे महासचिव संजय झाड, कोषाध्यक्ष विजय राठी, मुख्य संघटक राजेश राऊत इंदरचंद तवरावाला आदींसह मान्यवर उपस्थित होते. अमृत देशमुख, मोहन शिवूरकर, सुरेश शर्मा, संतोष अण्णा दाते, योगेश शर्मा, दत्तप्रसाद लड्डा, सुशीलकुमार वेगाने, ओमप्रकाश उबाळे, व्दारकादास जाधव, सुहास सोडानी, वीरेंद्र रुणवाल, प्रकाश सुराणा, सुदर्शन बांगड यांच्यासह मराठवाड्यातील विभागातील व्यापारी उद्योजक आदींसह पदाधिकारी परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परिषदेत झालेले ठराव असे

- जीएसटी करासह महाराष्ट्रात व्यापाऱ्यायांकडून वसूल केला जाणारा व्यवसाय कर रद्द करावा.
- कर प्रणाली संदर्भात एम. एस. टी. योजना लागू करावी.
- वाणिज्य मंत्रालयात असलेल्या नॅशनल ट्रेडर वेलफेअरवर व्यापारी प्रतिनिधीची नियुक्ती करावी.
- वीज दरवाढ कमी करुन अन्य शुल्क कमी करावेत. महानगरपालिका क्षेत्रात वसूल केला जाणारा आस्थापना कर रद्द करावा.

# महाराष्ट्र चेंबरच्या मुख्यालयास 'बेलारुस'चे कॉन्सुलेट जनरल अंतोन पाश्कोह यांची सदिच्छा भेट

### भारत- बेलारुस व्यापार वृद्धीची चर्चा, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार



**'बेलारूस' चे कॉन्सुलेट जनरल अंतोन पाश्कोह यांनी महाराष्ट्र चेंबरच्या फोर्ट येथील मुख्यालयास भेट दिली. त्या वेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार झाला. उपस्थितात सेक्रेटरी जनरल सागर नागरे.**

**मुंबई :** बेलारूस चे कॉन्सुलेट जनरल श्री अंतोन पाश्कोह यांनी महाराष्ट्र चेंबरच्या फोर्ट, काळा घोडा, ओरिकॉन हाऊस या मुख्यालयास भेट दिली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबर तर्फे त्यांचा सन्मान केला. भारत आणि बेलारूस या दोन्ही देशातील व्यापार वृद्धीसंदर्भात महत्वपूर्ण चर्चा या भेटीच्या दरम्यान झाली. तसेच 'महाराष्ट्र चेंबर' तर्फे शिष्टमंडळाने 'बेलारूस' ला भेट देण्यासाठी त्यांनी निमंत्रण दिले.

या वेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी निर्यात संदर्भातील महाराष्ट्र चेंबरतर्फे सुरु असलेल्या प्रयत्नांची माहिती देताना म्हणाले, महाराष्ट्र चेंबरतर्फे निर्यात प्रोत्साहन योजना राबविली जात आहे. शेजारील देशासह आखाती देश, आफ्रिकन देशात भारतीय उत्पादनांना मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. दरम्यान भारत व 'बेलारूस'दरम्यान द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासंबंधी विविध विषयावर सविस्तर चर्चा झाली. विशेषत: भारतातून ऑटोमोबाईल कंपोनंट्स, फार्मा व फळांच्या निर्यातीच्या मोठ्या संधी असल्याचे बेलारूस चे कॉन्सुलेट जनरल अंतोन पाश्कोह यांनी सांगितले. 'बेलारूस' मधून उच्च दर्जाचे टेक्स्टाईल व त्यासाठी लागणारे सिंथेटिक यार्न, मायनिंग साठीचे विशेष उपकरण इत्यादी विषयावर उभय देशांमधील व्यापार वाढवण्यासंबंधी चर्चा झाली. या वेळी 'बेलारूस' चे कॉन्सुलेट जनरल श्री अंतोन पाश्कोह यांनी दिलेल्या प्रस्तावावर महाराष्ट्र चेंबरतर्फे निश्चितच पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. या भेटीप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे सहकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते.

# मायटेक्स एक्स्पो २०२३ प्रदर्शनाला व्हिएतनामचे कौन्सुल जनरल बिएन ली भेट देणार

## व्हिएतनाम व महाराष्ट्र राज्यातील व्यापार-उद्योग वाढविण्यासाठी संयुक्तरित्या राज्यात उपक्रम राबविणार : ललित गांधी



**व्हिएतनामचे कौन्सुल जनरल बिएन ली यांना महाराष्ट्र चेंबरतर्फे आयोजित 'मायटेक्स एक्स्पो' चे माहितीपत्रक देताना अध्यक्ष ललित गांधी सोबत वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल लोढा, उपाध्यक्ष कातीलाल चोपडा, करूणाकर शेट्टी, श्रीकृष्ण परब तसेच चेंबरचे पदाधिकारी**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अॅग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने व्हिएतनामचे कौन्सुल जनरल बिएन ली यांची भेट घेतली. अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरतर्फे नाशिक येथे दि. ६ ते ९ ऑक्टोबर २०२३ व पुणे येथे दि. २० ते २९ ऑक्टोबर २०२३ दरम्यान आयोजित मायटेक्स एक्स्पो २०२३ प्रदर्शनाची माहिती दिली. या प्रदर्शनाच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्र व राज्यातील व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राला चालना देणे, प्रोत्साहन देण्यात येत आहे. राज्यातील व देशातील व्यापारी, उद्योजक प्रदर्शनात सहभागी होणार असून इतर देशाचे कौन्सुलेट जनरल व प्रतिनिधी सहभागी होणार असून व्यापार उद्योग वाढीच्या दृष्टीने महत्वपूर्ण सामंजस्य करार होणार असल्याची माहिती दिली. तसेच मायटेक्स एक्स्पो २०२३ प्रदर्शनाचे निमंत्रण दिले. तसेच व्हिएतनाम व महाराष्ट्र राज्यातील व्यापार, उद्योग, कृषी उद्योगांची देवाण घेवाण व व्यवसाय वृद्धीसाठी राज्यात महाराष्ट्र चेंबर व व्हिएतनाम कौन्सुल यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रम राबविण्यात येतील असे सांगितले. व्हिएतनामचे कौन्सुल जनरल बिएन ली यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती जाणून घेतली व कार्याची प्रशंसा केली.तसेच व्हिएतनाम व महाराष्ट्र राज्यातील व्यापार उद्योग वाढविण्यासाठी महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाने व्हिएतनामला भेट द्यावी असे निमंत्रण दिले. तसेच या भेटीत 'बी२बी' मिटिंग व नवनवीन संधी, व्यापार-उद्योगांच्या तंत्रज्ञानाची माहिती याबाबत सामंजस्य करार करता येतील अशी माहिती दिली. तसेच नाशिक व पुणे येथे आयोजित मायटेक्स एक्स्पो २०२३ प्रदर्शनाचे निमंत्रण स्वीकारून प्रदर्शनात सहभागी होण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले. मायटेक्स एक्स्पो २०२३ मुळे निश्चितच व्यापार उद्योगाला चालना मिळेल व नवनवीन संधी उपलब्ध होतील असे सांगून एक्सपोच्यायशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. व्यापारी, औद्योगीक, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राज्यातील शिखर संस्था म्हणून महाराष्ट्र चेंबरने महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. उत्तर महाराष्ट्र शाखा सुवर्ण महोत्सव वर्षपूर्ती साजरी करत आहे. त्यानिमित्त विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत.नाशिक व पुणे येथे आयोजित 'मायटेक्स एक्स्पो २०२३' हा त्याचाच भाग असून मायटेक्स एक्स्पो या ट्रेड फेअरच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्रातील व्यापार उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगाला राज्य व देश, जागतिक पातळीवर प्रोत्साहन देण्याचे काम होणार असून या माध्यमातून नवीन व्यापार उद्योगांच्या संधी प्राप्त होणार आहे. या एक्सपोमध्ये व्यापार, उद्योग, कृषी, उद्योग, बांधकाम, आयटी, शिक्षण ऑटोमोबाईल, गृहप्रकल्प, सोलार यासह विविध १५ हून अधिक क्षेत्रातील ३०० स्टॉल या प्रदर्शनात असणार आहेत. नाशिक येथे चार दिवस व पुणे येथे १० दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात विविध महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहेत. सदर एक्स्पो दरम्यान भारतातील इतर राज्यात कार्यरत असलेल्या विविध चेंबर्स, संस्था, संघटना यांचे प्रतिनिधी तसेच इतर देशातील कौन्सुलेट यांना निमंत्रित करून उत्तर महाराष्ट्र विभागाचा व्यापार उद्योग वाढावा यासाठी मायटेक्सपो २०२३ महत्वाचे ठरणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उत्तर महाराष्ट्राचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, मुंबई विभागाचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, कोकण विभागाचे उपाध्यक्ष एस. डी. परब, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे, सचिव नितीन भट उपस्थित होते.



# लघु व मध्यम उद्योगांना ४० टक्के स्वस्त वीज मिळणे शक्य : ललित गांधी

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आणि महाप्रीत संस्थेत सामंजस्य करार**

**राज्याच्या औद्योगिक विकासासाठी महाराष्ट्र चेंबरचे आणखी एक महत्वपूर्ण पाऊल**



**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरमध्ये आणि महाप्रीत या दोन्ही संस्थात बुधवारी सामंजस्य करार झाला. या वेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. 'महाप्रीत'चे व्यवस्थापकीय संचालक बिपिन श्रीमाळी , महाप्रीतचे संचालक पुरुषोत्तम जाधव, चीफ जनरल मॅनेजर दीपक कोकाटे, महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी , रवींद्र माणगावे शुभांगी तिरोडकर, कांतीलाल चोपडा, श्रीकृष्ण परब, सेक्रेटरी जनरल सागर नागरे, नितीन भट्ट.**

**मुंबई :** सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांना ४० टक्के स्वस्त वीज मिळणे शक्य आहे. महाराष्ट्रातील लघु व मध्यम उद्योगांना सोलर एनर्जीच्या माध्यमातून स्वस्त वीज मिळणार आहे. त्यामुळे राज्यामधील औदयोगिक क्षेत्रात नवीन क्रांती होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरमध्ये आणि महाराष्ट्र सरकारचा उपक्रम असलेल्या महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित ( महाप्रीत ) यांच्यात बुधवारी सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. त्या वेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रतिपादन केले.

'महाप्रीत'चे व्यवस्थापकीय संचालक बिपिन श्रीमाळी, महाप्रीतचे संचालक पुरुषोत्तम जाधव, चीफ जनरल मॅनेजर दीपक कोकाटे यांच्या हस्ते सामंजस्य करार झाला. दोन्ही संस्थातील



कराराने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग(एमएसएमई) सह स्वस्त दरात वीज उपलब्धेतसह आर्थिक विकास, नवनिर्मितीला प्रोत्साहन आणि उद्योगांची स्पर्धात्मकता वाढीला बळ मिळणार आहे.

या वेळी महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, रवींद्र माणगावे, शुभांगी तिरोडकर, कांतीलाल चोपडा, श्रीकृष्ण परब, सेक्रेटरी जनरल सागर नागरे, सचिव नितीन भट्ट यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, या दोन्ही संस्थात झालेल्या सामंजस्य करारानुसार एमएसएमईला मोठी चालना मिळणार आहे. वीज दरवाढीच्या प्रश्नांमध्ये राज्यातील उद्योगांना दिलासा देता येईल, अशी महत्त्वपूर्ण सुरुवात महाराष्ट्र चेंबरने केली आहे. राज्यातील उद्योगांना सध्या द्याव्या लागणाऱ्या वीज दरामध्ये ४०% पर्यंतची सवलत मिळेल, अशा पद्धतीने रूफ-टॉप सोलर च्या माध्यमातून एक नवी क्रांती घडविली जाणार आहे. महाराष्ट्र सरकारचा उपक्रम असलेल्या महाप्रीत व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांच्या दरम्यान एका सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. राज्यातील लघु व मध्यम उद्योगांना स्वतः कोणतीही अतिरिक्त गुंतवणूक न करता एका विशेष व्यवस्थेमध्ये रूट ऑफ रफ-टॉप सोलरची यंत्रणा उभारून किमान ४० टक्के कमी दरामध्ये वीजपुरवठा होईल. यामध्ये जागतिक बँकेचा आर्थिक सहभाग आहे. अधिक माहिती देताना ललित गांधी म्हणाले, विशेषत: एमएसएमईला लागणारी वीज ही महाराष्ट्रात १० ते १२ रुपये प्रतियुनिट दराने विक्री केली जाते. त्यामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा ४० टक्के खर्च हा वीजेवर होतो. हा वीजेचा भार कमी करण्यासाठी प्रामुख्याने सोलर, रुफ टॉप सोलरसाठी प्रचार केला जाणार आहे. सोलर एनर्जीच्या माध्यमातून प्रतियुनिट सुमारे पाच रुपये दराने वीज उपलब्ध होऊ शकेल. त्याचा फायदा होणारा उत्पादन खर्चात होणार असून अन्य राज्याच्या उत्पादनाच्या खर्चात आणि स्पर्धेत टिकण्यास मोठी मदत होईल, हा प्रमुख मुख्य उद्देश महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आणि महाप्रीत या संस्थेत झालेल्या करारामध्ये आहे. दरम्यान महाराष्ट्र सरकारतर्फे राबविल्या जात असलेल्या विविध उपक्रमांची माहिती 'महाप्रीत'चे व्यवस्थापकीय संचालक बिपिन श्रीमाळी , महाप्रीतचे संचालक पुरुषोत्तम जाधव, सीजीएम दीपक कोकाटे यांनी दिली.



# 'भारतीय रेल्वे बोर्डाच्या' अध्यक्षपदी जया वर्मा सिन्हा यांची निवड

### या पदावर नियुक्त होणाऱ्या पहिल्या महिला अधिकारी

१०५ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच भारतीय रेल्वेच्या अध्यक्षपदी महिलेची निवड करण्यात आली आहे. जया वर्मा सिन्हा या भारतीय रेल्वेच्या पहिल्या महिला अध्यक्षा झाल्या आहेत. जया वर्मा यांनी पदभार स्वीकारला.. अभिनंदन आणि शुभेच्छा !

# MIDC ने मागणी केलेला मागील काळाचा GST पूर्णपणे रद्द करावा, अन्यथा आंदोलन उभारु : ललित गांधी

## MIDC चा मागील जीएसटीसाठी तात्पुरती स्थगिती : उदय सामंत

**कोल्हापूर :** जीएसटीची वसुली एमआयडीसीतर्फे झाली नसल्यामुळे हा चुकीचा भुर्दंड भरणार नाही, अशी भूमिका उद्योजकांनी घेतली आहे. हा विषय सोडविण्यासाठी राज्य सरकारने समिती स्थापन केली असून त्याचा अहवाल येईपर्यंत धीर धरा, तोपर्यंत MIDC चा मागील जीएसटीसाठी तात्पुरती स्थगिती दिली असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कोल्हापुरात सांगितले.

कोल्हापुरातील उद्योजकांनी त्यांच्या विविध समस्या संदर्भात उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेतली. त्या वेळी महापालिका क्षेत्रातील गाळेधारकांचे भाडे, उद्योगांसाठी गायरान जमिनीची समस्या, गडहिंग्लज येथील औद्योगिक वसाहतीपर्यंतच्या रस्त्याची मागणी तसेच लघु उदयोजकांच्या निर्यातीला चालना देण्यासाठी प्रोत्साहन आणि औद्योगिक क्षेत्रातील जमिनीच्या विषयासंदर्भात चर्चा करण्यात आली.

एमआयडीसीने १ जुलै, २०१७ ते ४ सप्टेंबर, २०२२ या कालावधीत घेतलेल्या विविध सेवांवरील जीएसटी विलंब शुल्कासह भरण्याच्या नोटीसा उद्योजकांना पाठविल्या आहेत. एमआयडीसीने तेव्हा वसुली केली नाही, यामुळे सहा वर्षाचा जीएसटी व्याजासह भरावा लागणार आहे. याबाबतचा निर्णय सरकारच्या कोर्टात आहे. या प्रकरणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, ही रक्कम जवळपास १००० कोटीच्या घरात आहे. ही संपूर्ण रक्कम MIDC ने ज्या-त्या वेळी भरुन मागणी का केली नाही, याची जबाबदारी कोणाची असा सवाल केला. MIDC ने मागणी केलेला मागील काळाचा GST पूर्णपणे रद्द करावा, अन्यथा आंदोलन उभारले जाईल, अशा इशाराही त्यांनी या वेळी दिला.




दरम्यान या प्रश्नी उद्योजकांनी केलेल्या मागणीवर उदय सामंत म्हणाले, या प्रकरणी योग्य तो निर्णय सरकार घेईल. MIDC च्या मागील जीएसटीसाठी तात्पुरती स्थगिती दिली असल्याचेही त्यांनी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांना सांगितले.



### उद्योजकांना जमिनींचे वाटप एमआयडीसीकडूनच

गुरुदत्त शुगर्सचे राहुल घाटगे यांनी इथेनॉल, सीएनजीच्या जिल्ह्यातील प्रकल्पांसाठी गायरान जमिनींची अडचण असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यावर मंत्री सामंत म्हणाले, या संदर्भात राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. उद्योजकांना देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जमिनी एमआयडीसीच्या माध्यमातूनच देण्यात येतील, तेव्हा हा प्रश्न सुलभ होईल. कोणत्याही जागेतील प्रकल्पाच्या बदल्यात राज्यात कुठेही जागा देण्यात येईल

गडहिंग्लज येथील औद्योगिक वसाहतीकडे जाणारा रस्ता निमुळता असून कर्नाटक सरकारच्या हद्दीतून जातो. त्या सरकारशी बोलून हा विषय मार्गी लावावा, या मागणीवर सामंत यांनी त्या सरकारच्या हातातील निर्णयाबद्दल नंतर बोलू पण या ठिकाणी जाण्यासाठी बायपासचे रस्ते करण्याचा प्रस्ताव दिल्यास तो युद्धपातळीवर पूर्ण करु, असे सांगितले.

# गतीमान व त्वरित निर्णयासाठी प्रसिद्ध उद्योमंत्र्यांनी कोल्हापूरच्या उद्योजकांना दिलेले आश्वासन पूर्ण केले : ललित गांधी

## कोल्हापूर, उद्योजकांच्या सामूहिक प्रयत्नानेच मोठा उद्योग शक्य : मंत्री उदय सामंत

### औदयोगिक वसाहतीतील पायाभूत सुविधांसाठी १२० कोटींचा निधी



**गोकुळ शिरगाव एमआयडीसी येथील विविध विकासकामांचे भूमिपुजन उद्योगमंत्री उदय सामंत व अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, खासदार धनजंय महाडिक, खासदार धैर्यशील माने, आमदार ऋतुराज पाटील, 'गोशिमा' अध्यक्ष दीपक चोरगे, मॅकचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे व अन्य उद्योजक आणि मान्यवर.**

**कोल्हापूर** : कोल्हापूरच्या उद्योगाला गती देण्यासाठी आणि रोजगारनिर्मिती वाढण्याच्या दृष्टीने या ठिकाणी मोठा उद्योग येणे अपेक्षित आहे, यासाठी लोकप्रतिनिधी, उद्योजकांच्या सामूहिक प्रयत्नानेच मोठा उद्योग येऊ शकतो. तसेच कोल्हापूर– सांगली जिल्ह्याच्या सीमेवर जागा सुचवा, आपण त्या ठिकाणी सुमारे १ हजार एकरावर एमआयडीसी उभी करु, असे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, कोल्हापूरच्या औद्योगिक वसाहतीतील पायाभूत सुविधांसाठी १२० कोटींचा निधी दिला आहे. कोल्हापूरला मोठे उद्योग आणण्यासाठी येथील पायाभूत सुविधा, विमानसेवा, रेल्वे सुविधा भक्कम असल्याने गरजेचे आहे. म्हणूनच एम आयडीसीमधील पायाभूत सुविधा भक्कम केल्या जात आहेत. खासदार धनंजय महाडिक म्हणाले, राज्यातील यापूर्वी अडीच वर्षात स्थगितीचे सरकार होते. मात्र, आताच्या वेगवान महायुती सरकारकडून गतिमान काम होत आहे. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्याच्या मध्यभागी एक हजार एकरावर मोठी एमआयडीसी उभारावी. या वेळी खासदार धैर्यशील माने, आमदार ऋतुराज पाटील यांची भाषणे झाली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, गतीमान आणि त्वरित निर्णयासाठी प्रसिद्ध उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कोल्हापूरच्या उद्योजकांना दिलेले आश्वासन पूर्ण केले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र चेंबरच्या पुढाकाराने एमआयडीसी व उद्योग विभागात वतीने १८ जानेवारी, २०२३ रोजी हॉटेल सयाजी येथे कोल्हापूर जिल्हा आढावा बैठक घेतली होती. त्यामध्ये उद्योजकांनी विविध प्रश्न मांडले होते. त्याची पूर्तता उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली आहे.

या वेळी गोशिमा अध्यक्ष दीपक चोरगे, मॅकचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, कोल्हापूर चेंबरचे संचालक विज्ञानंद मुंढे, स्मॅकचे अध्यक्ष दीपक पाटील, उपाध्यक्ष एम. वाय. पाटील, उद्योजक सचिन शिरगांवकर, सत्यजित जाधव, सुजित चव्हाण, शिवाजीराव जाधव, राजेखान जमादार, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राहुले भिंगारे, कार्यकारी अभियंता अतुल ढोरे, उपअभियंता ए. आय. नाईक, अजयकुमार रानगे, रणजित बिरंजे, एस. व्ही. अपराज, दिलीप जोगवे, सुधीर नागे उपस्थित होते. मुख्य अभियंता नितीन वानखेडे यांनी प्रास्ताविक केले. कार्यकारी अभियंता राहुल तिडके यांनी आभार मानले.

#### महाराष्ट्र चेंबरने पुढाकाराने झालेल्या बैठकीतील आश्वासनांची पूर्तता

कोल्हापूरच्या उद्योगाला गती देण्यासाठी आणि रोजगारनिर्मिती वाढीसह अन्य विषयांवर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या पुढाकाराने कोल्हापुरात हॉटेल सयाजी येथे १८ जानेवारी, २०२३ रोजी बैठक घेतली होती. महाराष्ट्र चेंबरच्या पुढाकाराने महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, उद्योग विभाग, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनासोबत सयुंक्त बैठक झाली होती. या बैठकीत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली आहे. राज्यात उद्योगांना चालना देण्यासाठी औद्योगिक वसाहतींना आवश्यक त्या सुविधा गतीने उपलब्ध करुन देण्याची घोषणा केली होती. कोल्हापूरच्या औद्योगिक वसाहतीतील पायाभूत सुविधांसाठी १२० कोटींची निधी उपलब्ध करुन देण्याची घोषणा केली होती. मोठा उद्योग आणण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले होते. महाराष्ट्र चेंबरच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या बैठकीत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी घोषणा केल्या होत्या. त्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केल्याने उद्योजकांतून समाधान व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून अनेक उद्योजक व्यापाऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी मार्गी : अनिलकुमार लोढा

## धूळे येथे डिसेंबरमध्ये चेंबर कार्निवल होणार : नितीन बंग





**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या धुळे येथे झालेल्या बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा. चेंबरचे उपाध्यक्ष नितीन बंग उपस्थितात वरिष्ठ गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य अरुण नावरकर, गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य पवन अग्रवाल.**

धुळे : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरच्या माध्यमातून व्यापारी आणि उद्योजकांचे अनेक प्रश्न सरकार दरबारी मार्गी लागले. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रश्न सातत्याने मार्गी लागत असून भविष्यातही व्यापारी आणि उद्योजकांना भेडसविणारे अनेक प्रश्न सोडविले जाणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची धुळे येथे बैठक उत्साहात संपन्न झाली. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली नवनियुक्त उपाध्यक्ष नितीन बंग यांनी या बैठकीचे नियोजन केले. त्या वेळी या बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. दरम्यान डिसेंबरमध्ये चेंबर कार्निवल आयोजित करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष नितीन बंग यांनी सांगितले. या बैठकीला धुळे व जळगांव येथील गर्व्हनिंग काऊन्सिल मेंबरसह मालेगाव, नवापूर, दोंडाईचा, शहादा, साक्री, येथील व्यापारी व उद्योजक उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा म्हणाले, राज्यातील व्यापार, उद्योग व कृषीपूरक उद्योगाची शिखर संस्था म्हणून महाराष्ट्र चेंबर कार्यरत आहे. महाराष्ट्र चेंबरचा अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीत मोठा कणा असून महाराष्ट्राच्या व्यापार आणि उद्योग वृद्धीसाठी गेल्या ९५ वर्षापासून सातत्याने कार्यरत आहे. राज्यातील सर्वांत मोठी असलेली ही शिखर संस्था विविध क्षेत्रात आपल्या कार्याचे योगदान देत आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या औद्योगिक विकासात महत्वपूर्ण योगदान देणारी ही संस्था आहे. उद्योजक, व्यापारी यांचे हक्कांचे व्यासपीठ चेंबर असून त्या माध्यमातून राज्यातील अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत.

महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष नितीन बंग म्हणाले, महाराष्ट्र चेंबरचे कार्य पूर्वी ठराविक भागात होते. ते आता महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या दूरदृष्टी व व्यापक धोरणामुळे महाराष्ट्रात अधिकाधिक शहरात पोहोचविण्यात येत आहे. याचच भाग म्हणजे तब्बल २० वर्षानंतर आपल्या भागाला उपाध्यक्षपद मिळाले आहे. तसेच चेंबरचे धुळे येथेही कार्यालय सुरु करण्याचा मानस आहे. येत्या २२ ते २४ डिसेंबर दरम्यान शेतकरी मेळावा, सेवा व अन्य उद्योगांसाठी चर्चासत्र, व्यापार मार्गदर्शन शिबिर आदी विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

महाराष्ट्र चेंबरच्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन तथा गव्हर्निंग कौन्सिल मेंबर संगीता पाटील यांनी महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष नितीन बंग यांचे अभिनंदन करुन महाराष्ट्र चेंबर ची माहिती देऊन जास्तीत जास्त मेंबरशिप वाढवण्याचे आवाहन केले. 'शासन आपल्या दारी' हा जसा उपक्रम राबविला जात आहे, त्याच धर्तीवर ' महाराष्ट्र चेंबर आपल्या दारी' हा उपक्रम राबविला जाईल. जळगाव सारखे धुळे येथेही महाराष्ट्र चेंबरचे स्वतंत्र कार्यालय व्हावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

यावेळी उपस्थित उद्योजक व व्यापाऱ्यांनी सोलर पॅनल, वीज दर, टेक्सटाईल मार्केट याबाबत प्रश्न मांडले. तसेच नवलनगर येथील एमआयडीसीच्या नवीन जागेसाठी महाराष्ट्र चेंबरने लक्ष घालावे, अशी विनंती केली. महेश नावरकर, ओमप्रकाश गगरानी, राजेश गिंदोडिया, पिकेश अग्रवाल, पवन अग्रवाल, ईश्वर पाटील, शशांक भावसार, सुनील रुणवाल, किरण बच्छाव, पारस जैन यांनी व्यापार, उद्योग आणि शेती संबधित अचडणी मांडल्या. गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य पवन अग्रवाल यांनी सूत्रसंचालन केले. गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य अरुण नावरकर यांनी आभार मानले.




# मराठवाडा विभागाच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर कटिबद्ध : ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबरतर्फे मराठवाडा विभाग विकासाच्या दृष्टीने थेट संवाद अध्यक्षांशी कार्यक्रम संपन्न

**नाशिक :** मराठवाडा विभागाच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरतर्फे मराठवाडा विभागाच्या विकासाच्या दृष्टीने 'थेट संवाद अध्यक्षांशी' हा कार्यक्रम हॉटेल रिच येथे संपन्न झाला. त्या वेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पहिली व्यापारी परिषद संभाजीनगर येथे घेतली. त्याचे फलित ' नॉन वोव्हन बॅग्स व पेपर उत्पादनांना बंदी' आदेशातून शिथिलता मिळाली, व्यापाऱ्यांना मोठा फायदा झाला. महाराष्ट्र चेंबरच्या मागणीला यश आले. कोरोना काळातील उद्योजकांचे प्रलंबित २३०० कोटींचे अनुदान थेट उद्योजकांच्या बँक खात्यात मिळवून देण्यात यश मिळाले असून, विमानसेवा, औद्योगिक वसाहत, वीजदर यासह विविध विषयावर राज्य व केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरु आहे.

दरम्यान त्यांनी आपल्या भाषणात मराठवाडा विभागाच्या विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. महाराष्ट्र चेंबरतर्फे राबविण्यात येत असलेले विविध उपक्रम, केंद्र व राज्य सरकारकडून व्यापार उद्योग, कृषी क्षेत्राचे प्रश्न सोडवण्यासाठी सुरू असलेल्या विविध प्रश्नांची माहिती दिली. वेळ पडल्यास रस्त्यावर उतरून आंदोलने केली आहे व गरज पडल्यास पुन्हा आंदोलने केली जातील. मराठवाडा विभागाच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर कटिबद्ध असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सांगितले.

या वेळी व्यासपीठावर घनश्याम गोयल, डी. बी. सोनी, अनिल पाटील, शिवप्रसाद जाजू, जगन्नाथ काळे, जसवंतसिंग आदींसह मान्यवर उपस्थित होते. मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष तनसुख झाबड यांनी महाराष्ट्र चेंबरतर्फे सुरू असलेल्या राज्यातील विविध उपक्रमांची माहिती देत मराठवाडा विभागाच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले. माजी अध्यक्ष मानसिंगजी पवार यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचे कौतुक केले. राज्यस्तरावरील विषय महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून सोडविण्यात येतात. प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने आंदोलने करावी त्याला मराठवाडा भक्कम साथ देईल, असेही त्यांनी सांगितले. सतीश लोणीकर यांनी सूत्रसंचालन केले. अर्जुन गायके यांनी आभार मानले.

### विविध प्रश्न मांडले

मराठवाड्यातील व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राशी संबंधित विविध अडचणी व प्रश्न अनिल पाटील, शिवप्रसाद जाजू, जगन्नाथ काळे, ओमप्रकाश डागा, अजय शहा पारस मुथा व उपस्थित व्यापारी उद्योजकांनी मांडले. प्रामुख्याने मराठवाडा विभागातील वीजदर, विकासासाठी मिळणारा निधी, वस्त्रोद्योगाच्या अडचणी, जीएसटी, आरसीएम कर, कामगार कायदे, सोलर, एपीएमसी यासह विविध प्रश्न मांडले.

# MACCIA महाराष्ट्र रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट प्रा. लि. ची स्थापना

## संस्थापक संचालकांसाठी सात मान्यवरांची प्रत्येकी ५ लाखांची गुंतवणूक

**मुंबई :** क्लस्टर्स प्रकल्प उभारणीसाठी सरकारच्या नियमानुसार 'ना नफा- ना तोटा' या तत्वावर सेक्शन ८ खाली **MACCIA MAHARASHTRA RESEARCH AND DEVELOPMENT PRIVATE LIMITED** ही कंपनी स्थापन केली आहे. या कंपनीमध्ये संस्थापक संचालकांसाठी सात मान्यवरांनी गुंतवणूक केली आहे. महाराष्ट्र चेंबरच्या इतिहासातील हे महत्वाकांक्षी पाऊल आहे.

यामध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अॅण्ड अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी (कोल्हापूर) उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, विजय वेदमूथा (नाशिक), नितीन इंगळे (जळगाव), चंद्रशेखर सिंग (नाशिक), निलेश चव्हाण (संगमनेर) आणि उमेश वानखेडे यांनी या कंपनीमध्ये गुंतवणूक केली आहे. या सर्व मान्यवरांनी प्रत्येकी ५ लाख रुपये गुंतवणूक केली आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अॅण्ड अॅग्रीकल्चरने संपूर्ण महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात १८ जिल्ह्यात आणि दुसऱ्या टप्प्यात २०२७ पर्यंत उर्वरित १८ जिल्ह्यात क्लस्टर, सीएफसी, एक्सलन्सी सेंटर्स उभारण्याचा संकल्प जाहीर केला आहे. ज्यामध्ये कृषी आधारित १२ क्लस्टर्स, महिला उद्योजिका १२, क्लस्टर्स व उत्पादन आधारित १२ क्लस्टर्स अशी योजना प्रस्तावित आहे. या क्लस्टर्स प्रकल्प उभारणीसाठी सरकारच्या नियमानुसार 'ना नफा - ना तोटा' तत्वावर सेक्शन ८ खाली स्वतंत्र कंपनी स्थापन करणे आवश्यक आहे. **MACCIA MAHARASHTRA RESEARCH AND DEVELOPMENT PRIVATE LIMITED** ही कंपनी स्थापना करण्यास व गुंतवणूक करण्यास महाराष्ट्र चेंबरची

### संस्थापक संचालकांसाठी सात मान्यवरांची प्रत्येकी ५ लाखांची गुंतवणूक

| | | |
|---|---|---|
| ■ ललित गांधी | : | ५ लाख |
| ■ कांतीलाल चोपडा | : | ५ लाख |
| ■ विजय वेदमुथा | : | ५ लाख |
| ■ नितिन इंगळे | : | ५ लाख |
| ■ चंद्रशेखर सिंग | : | ५ लाख |
| ■ निलेश चव्हाण | : | ५ लाख |
| ■ उमेश वानखेडे | : | ५ लाख |

सर्वसाधारण सभा, व्यवस्थापन समिती आणि कार्यकारिणी या तिन्ही स्तरावर मंजुरी मिळाली आहे. महाराष्ट्र चेंबरच्या १०० वर्षाच्या इतिहासातील हा सर्वांत महत्वपूर्ण व अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प असून तो संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या कंपनीची स्थापनेची प्रक्रिया सुरु झाली असून सरकारी अनुदाना व्यक्तरिक्त कराव्या लागणाऱ्या या गुंतवणूकीसाठी भाग भांडवल उभारणी सुरु झाली आहे. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात संस्थापक संचालकांसाठी ७ मान्यवरांनी गुंतवणूक केली आहे. कंपनीचे सुरुवातील हे शेअर्स मॅनेजिंग कमिटी मेंबर्स, एक्स्पर्ट कमिटी चेअर आणि को-चेअर, गव्हर्निंग काऊन्सील मेंबर्स यांच्यासाठीच उपलब्ध असतील. १ शेअर्सचे मूल्य १ लाख इतके आहे. अन्य सर्व गुंतवणूकदारामधून नियमानुसार संचालक निवडले जाणार आहेत.



**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर, महिला उद्योजकता समिती व मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात बोलताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील. उपस्थितात डावीकडून मुंबई बँकेचे विभागीय सरव्यवस्थापक समीर महापुष्पे, चेंबरच्या उपाध्यक्षा शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईच्या संचालिका रुपा नाईक, महिला उद्योजकता समितीच्या को-चेअरपर्सन कविता देशमुख, मुंबई बँकेचे विभागीय सरव्यवस्थापक संदीप सुर्वे.**

# महिला उद्योजिका स्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र चेंबरचे नेहमीच पाठबळ : संगीता पाटील

## महाराष्ट्र चेंबरची महिला समिती आणि मुंबई जिल्हा सहकारी बँकेतर्फे व्याख्यान संपन्न

**मुंबई** : मूळत: उद्यमशील स्वभाव असलेल्या महिलांनी उद्योजिका होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारले पाहिजे. महिला सक्षम आहेतच, त्यांनी उदयोग क्षेत्रात आपला ठसा उमटविला पाहिजे. त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे पाठबळ कायम राहील, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर, महिला उद्योजकता समिती व मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आंतरराष्ट्रीय व्यापार व महिला उद्योजकांसाठी भांडवल उभारणी' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. मुंबई फोर्ट येथील डॉ. डी. एन. रोडवरील मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित येथील पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील सभागृहात हे व्याख्यान उत्साहात संपन्न झाले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.

महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष शुभांगी तिरोडकर, महिला उद्योजकता समितीच्या को-चेअरपर्सन कविता देशमुख, धनश्री हरदास, महिला समिती सदस्या श्वेता इनामदार, गौरी खेर, गीता करमसी, महाराष्ट्र चेंबरचे सहकार्यवाह सागर नागरे यांच्या प्रमुख उपस्थित कार्यक्रम झाला.

या वेळी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबरच्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील म्हणाल्या, 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे' अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र चेंबर अंतर्गत महिलांसाठी धोरण आखले गेले आहे. ३६ जिल्ह्यासाठी हे धोरण आहे. महिला या मुळातच उदयोजक, उत्तम प्रशासक असतात, मात्र अनेकदा ते घरापुरतं मर्यादित राहतं. घराबाहेरच्या विशाल जगात त्या गुणांचं सार्थक व्हावे, म्हणून उद्योजिका होण्याचे स्वप्न महिलांनी प्रत्यक्षात आणायला हवे. त्यासाठी महाराष्ट्र चेंबर महिलांसाठी दीपस्तंभाचे काम करीत असून महिलांना सातत्याने पाठबळ देत राहणार आहे. महिलांनी उद्योग जगतात पाऊले ठेवायला हवीत. परंतू, नवीन उद्योग स्थापन करताना महिलांसमोर भांडवल हा विषय असतो. त्यामुळे आपल्या बँकेतर्फे कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करुन द्यावे.

वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईच्या संचालिका रुपा नाईक यांनी 'आंतरराष्ट्रीय व्यापार' या विषयावर मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या येणाऱ्या १० वर्षात महिलांना आंतरराष्ट्रीय व्यापारात सुवर्णसंधी आहे. १९० देशात ३३० वर्ल्ड ट्रेड सेंटर असून या सर्व देशात महाराष्ट्र चेंबरच्या महिला सदस्यांना मार्केट स्टडी व बायर्स शोधण्यासाठी वर्ल्ड ट्रेड सेंटर सर्वोतोपरी मदत करेल. गारमेंटस् टेक्सटाइल, ज्वेलरी, फूड प्रॉडक्टस् अशा प्रकारचे प्रॉडक्ट शोधून वेगवेगळ्या देशातील गरजेनुसार महिलांना आंतरराष्ट्रीय व्यापारात करिअर करता येऊ शकते.

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभागीय सरव्यवस्थापक समीर महापुष्पे, संदीप सुर्वे यांनी 'महिला उद्योजकांसाठी भांडवल उभारणी' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी मुंबई बँकतर्फे महिलांसाठी उपलब्ध असलेल्या विविध योजनांची माहिती सांगितली. महिलांसाठी विशेष कर्ज योजना असल्याचे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग मायटेक्स एक्स्पो नाशिक - २०२३ मध्ये संयुक्त आयोजक म्हणून सहभागी - नाम. उदय सामंत




**मायटेक्स एक्स्पो नाशिक मध्ये महाराष्ट्र शासन उद्योग विभागाचा सहभाग घोषित करताना नाम. उदय सामंत, नाम. दादा भुसे, ललित गांधी, अनिल लोढा, कांती चोपडा, रविंद्र माणगावे, पंढरी किरवे, सागर नागरे**

**मुंबई** : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर तर्फे ६ ऑक्टोबर ते ०९ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत नाशिक येथे संपन्न होत असलेल्या 'मायटेक्स एक्स्पो २०२३' मध्ये महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग व एम.आय.डी.सी. संयुक्त आयोजक म्हणून सहभागी असतील अशी घोषणा राज्याचे उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांनी केली.

नाशिक चे पालकमंत्री व राज्याचे खनिज, बंदरे व सार्व. बांधकाम मंत्री नाम. दादा भुसे यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल लोढा, उपाध्यक्ष कांती चोपडा, रविंद्र माणगावे, सेक्रेटरी जनरल सागर नागरे, उद्योजक पंढरी किरवे यांची उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांच्या समवेत मंत्रालयात बैठक संपन्न झाली त्याप्रसंगी ते बोलत होते.


मायटेक्स प्रदर्शनासाठी उद्योग विभागाचे संपूर्ण सहकार्य राहील अशी ग्वाही देऊन नाम. उदय सामंत यांनी यावेळी उद्योजक व व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली.




**महाराष्ट्राचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री नाम. राधाकृष्ण विखे पाटील यांना मायटेक्स एक्स्पो २०२३ – नाशिक'चे आमंत्रण देताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, कांती चोपडा, सागर नागरे.**

# SALIENT FEATURES OF AMNESTY SCHEME-2023 FOR SALES TAX AND ALLIED TAXES

**Adv. Pradeep Kshatriya**
(Ex-Governing Council Member)



## INTRODUCTION

- Almost all the assessments under **MVAT & CST** and allied Acts for the period upto 30.06.2017 are completed by now. Due to which large number of cases & litigation were pending at various levels which involved substantial amount of tax under old Acts.
- Therefore Government has provided a scheme of settlement of arrears of tax, interest, penalty or late fee under the old acts, for the periods ending on or before the 30th June, 2017.
- Any Scheme of settlement of arrears of tax, interest, penalty, etc. is popularly known as **AMNESTY SCHEME**
- The Amnesty Scheme came in FY 2022-23, but some dealers were not able to settle the dues in that Scheme.
- Now again the Government has provided another Amnesty Scheme in FY 2023-24.
- This presentation is based on-
- **The Maharashtra Settlement of Arrears of Tax, Interest, Penalty or Late FeeAct, 2023** published in the gazette dated 06.04.2023. (Maha. Act No. XVIII of 2023).

## Dues under the following Acts covered under the Scheme?

(a) The Central Sales Tax Act, 1956;
(b) The Bombay Sales of Motor Spirit Taxation Act, 1958 ;
(c) The Bombay Sales Tax Act, 1959;
(d) The Maharashtra Purchase Tax on Sugarcane Act, 1962 ;
(e) The Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employment Act, 1975;
(f) The Maharashtra Sales Tax on the Transfer of the Right to use any Goods for any Purpose Act, 1985;
(g) The Maharashtra Tax on Entry of Motor Vehicles into Local Areas Act,1987;
(h) The Maharashtra Tax on Luxuries Act, 1987 ;
(i) The Maharashtra Sales Tax on the Transfer of Property in Goods involved in the Execution of Works Contract (Re-enacted) Act,1989;
(j) The Maharashtra Tax on Entry of Goods into Local Areas Act, 2002, and
(k) The Maharashtra Value Added Tax Act, 2002.

**“Un-disputed Tax”** under the Scheme shall be as under-

- Taxes collected separately under Relevant Act, or
- Taxes shown payable in the return or revised return under Relevant Act, or
- An amount claimed by the dealer as deduction as per Rule 57 of the MVAT Rules or similar Rules under other Relevant Act , or
- An amount forfeited under the statutory order or excess tax collection shown in the return/revised return or audit report submitted under Relevant Act , or

- Any amount of tax determined and recommended to be payable by the auditor in Vat Audit report accepted by the assessee, either wholly or partly, or
- Tax deducted at source (TDS) under MVAT Act.
- Tax collected at source (TCS) under MVAT Act.
- The tax payable by the Enrolment Certificate holder under Profession Tax Act.
- Tax deducted by the employer under Profession Tax Act.
- Amount of set-off disallowed u/r. 52A or 52B of MVAT Act which is eligible to be claimed in the subsequent period.

**"Disputed Tax"** shall mean the tax other than un-disputed tax.

## ELIGIBILITY FOR SETTLEMENT

- Any dealer registered or not registered under Relevant Act
- Whether such arrears are disputed in appeal under Relevant Act or not. (Filing of Appeal is not a pre-condition)
- Applicant who has availed benefits under old Amnesty Schemes, 2016, 2019 & 2022 shall also be eligible to make an application under 2023 scheme.
- The conditions of settlement provided under the Act shall be complied with.
- In the matters in which Mah. GST Department has filed reference before the Tribunal or Courts, the demand disputed by the department may be considered for settlement.
- There shall be no refund of tax paid, and
- There shall no recovery of amount waived in future.

## WHAT ARREARSARE ELIGIBLE FOR SETTLEMENT?

- Any payment made in respect of statutory order on or before 30.04.2023 shall be adjusted in following chronology-

1. Un-disputed Tax
2. Disputed Tax
3. Interest
4. Penalty
5. Late Fee

- The balance amount remained outstanding as on 01.05.2023 shall be eligible for Settlement.
- Also any demand raised for the specified period by any statutory order passed during the period from 01.05.2023 to 31.10.2023 shall be considered for settlement.
- The above provisions shall apply mutatis mutandis (as it is) to the return dues.

## WRITE OFF IN RESPECT OF CERTAIN AMOUNT

- Notwithstanding anything contained in the Relevant Act or under the provisions contained in this Act-
- Any arrears determined as per any statutory order for the period upto 30.06.2017 (Specified period) as on 30.04.2023
- Which are Rs. 2,00,000/- or less per financial year under each of Relevant Act shall be written off
- The post assessment interest on such written off dues shall stand waived.

## OPTION AND DURATION FOR PAYMENT OF REQUISITE AMOUNT

- The requisite amount shall be paid under "One Time Payment option".
- Provided that in case of arrears are in excess of Rs. 50 Lakhs, then applicant may opt to pay the requisite amount under "Instalment option".
- The duration for the payment of requisite amount and the submission of the application under Settlement Act shall be as per the table in the next slide….

**Duration for submission of Application and payment of the requisite amount**

**TABLE**

| Sr. No. | Particulars | Option 1 | Option 2 |
|---|---|---|---|
| | | One Time Payment Option | Instalment Option |
| (1) | Duration for submission of Application | From 01.05.2023 to14.11.2023. | From the 1st May 2023 to 14thNovember, 2023. |
| (2) | Duration in which Requisite amount to be paid. | From 01.05.2023 to 31.10.2023 | Minimum 25% of requisite amount to be paid from 01.05.2023 to 31.10.2023.<br><br>Remaining amount in 3 equal quarterlyinstalments from the date of application i.e. within 9 months.<br><br>Interest @ 12% for late payment of instalment. But, if all instalment are not paid within 9 months proportionate benefit will be granted. |

## CONDITIONS FOR SETTLEMENT

- Withdrawal of Appeal:
- If any appeal is pending before the Appellate Authority or the Tribunal or the Court in respect of any statutory order shall be withdrawn fully and un-conditionally. (Part withdrawal of Appeal Not allowed)

## APPLICATION FOR SETTLEMENT OF ARREARS

- Separate application for each class of arrears qua the Relevant Act for each financial year before the last date specified i.e. 14.11.2023.
- Provided a delay upto 30 days may be condone by the authority considering to the reasons for delay.
- For return dues, separate application for each return period to be made.
- Provided applicant may make a single application for all the return periods within one financial year.
- Application shall be accompanied by proof of payment of full requisite amount in case of "One Time Payment option" and minimum 25% of the requisite amount in case of "Instalment option".

## ORDER OF SETTLEMENT

- If Designated authority is satisfied that the applicant has paid the requisite amount correctly, then he shall pass an Order of Settlement & provide copy within-
- 3 months from 31.10.2023 in case of One Time Payment Option, OR
- 3 months from the date specified for payment of last instalment in case of instalment option.

**Following are the Annexures showing the amount to be paid and waiver under Amnesty Scheme.**

**Annexure-A**
**For the periods from 1st April 2005 to 30th June 2017**

| SR. NO | AMOUNT | ONE TIME PAYMENT OPTION: AMOUNT TO BE PAID | ONE TIME PAYMENT OPTION: AMOUNT OF WAIVER | INSTALLMENT OPTION: AMOUNT TO BE PAID | INSTALLMENT OPTION: AMOUNT OF WAIVER |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Un-disputed Tax. | **100%** | **NIL** | **100%** | **NIL** |
| 2 | Disputed Tax. | **50%** | **50%** | **56%** | **44%** |
| 3 | Interest payable under the Relevant Act or interest payable as per any statutory order or returns or revised returns. | **15%** | **85%** | **15%** | **85%** |
| 4 | Outstanding penalty as per any statutory order. | **5%** | **95%** | **5%** | **95%** |
| 5 | Post assessment interest or penalty or both leviable under the Relevant Act but not levied upto the date of application by the dealer. | **0%** | **100%** | **0%** | **100%** |
| 6 | Late fee payable in respect of returns filed on or before the 31st March 2023. | **5%** | **95%** | **5%** | **95%** |

OR

| SR. NO | AMOUNT | ONE TIME PAYMENT OPTION: AMOUNT TO BE PAID | ONE TIME PAYMENT OPTION: AMOUNT OF WAIVER | INSTALLMENT OPTION: AMOUNT TO BE PAID | INSTALLMENT OPTION: AMOUNT OF WAIVER |
|---|---|---|---|---|---|
| 7 | Where amount of arrears as per any statutory order is of rupees **Fifty lakh** or less, applicant may opt for **lumpsum** payment instead of determining requisite amount as per Sr. Nos. (1) to (4) and (6) above. | **20%** of the arrears | **80%** of the arrears along with Post assessment interest or penalty or both leviable under the Relevant Act but not levied upto the date of application | Not Applicable | Not Applicable |

**Annexure – B**
**For the periods ending on or before 31st March, 2005**

| SR. NO | AMOUNT | ONE TIME PAYMENT OPTION: AMOUNT TO BE PAID | ONE TIME PAYMENT OPTION: AMOUNT OF WAIVER | INSTALLMENT OPTION: AMOUNT TO BE PAID | INSTALLMENT OPTION: AMOUNT OF WAIVER |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Un-disputed Tax. | **100%** | **NIL** | **100%** | **NIL** |
| 2 | Disputed Tax. | **30%** | **70%** | **34%** | **66%** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | Interest payable under the Relevant Act or interest payable as per any statutory order or returns or revised returns. | **10%** | **90%** | **10%** | **90%** |
| 4 | Outstanding penalty as per any statutory order. | **5%** | **95%** | **5%** | **95%** |
| 5 | Post assessment interest or penalty or both leviable under the Relevant Act but not levied upto the date of application by the dealer. | **0%** | **100%** | **0%** | **100%** |

OR

| | | ONE TIME PAYMENT OPTION | | INSTALLMENT OPTION | |
|---|---|---|---|---|---|
| **SR. NO** | **AMOUNT** | **AMOUNT TO BE PAID** | **AMOUNT OF WAIVER** | **AMOUNT TO BE PAID** | **AMOUNT OF WAIVER** |
| 6 | Where amount of arrears as per any statutory order is of rupees **Fifty lakhs** or less, applicant may opt for **lumpsum** payment instead of determining requisite amount as per Sr. Nos. (1) to (4) above. | **20%** of the arrears | **80%** of the arrears along with Post assessment interest or penalty or both leviable under the Relevant Act but not levied upto the date of application | Not Applicable | Not Applicable |

## NO REFUND OF THE AMOUNT PAID UNDER THE SETTLEMENT ACT

- The Act provides that the applicant shall not be entitled to any refund of any amount paid under this Act on any account.
- However, in case the application filed for the settlement is rejected or revoked then the amount paid under this Act shall be treated to have been paid under the Relevant Act.


## CONCLUSION

- This settlement of Arrears Scheme seems to be a last chance for settlement of arrears under all pre-GST taxation laws.
- The dealers having arrears of undisputed as well as disputed tax dues, interest, penalties and late fees may apply and get the good benefit out of the scheme.
- Careful calculation of undisputed as well as disputed tax dues, interest is the task of utmost importance.
- Any mistake in filing application under Amnesty may lead to the financial losses which may lead to further litigations.

I have tried to cover all important aspects of the Amnesty Scheme-2023 in this article. However, procedural part of the scheme is not covered. Readers are advised to take the consultation from their Tax Consultants/CAs for more information related to your business before making an application under the Amnesty Scheme.

# इंडोनेशिया-भारतातील द्विपक्षीय व्यापार वृध्दिसाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' संयुक्त उपक्रम राबविणार - ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळास इंडोनेशिया भेटीचे आमंत्रण



मुंबई - भारत - इंडोनेशिया दरम्यान द्विपक्षीय व्यापार वृध्दीसाठी इंडोनेशिया वाणिज्य व पर्यटन विभाग व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स संयुक्त उपक्रम राबवतील अशी माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी व इंडोनेशियाचे भारतातील महावाणिज्यदूत जनरल एड्डी वर्दोयो यांनी दिली.

इंडोनेशिया चे भारतातील नवनियुक्त महावाणिज्यदुत (काऊन्सील जनरल) एड्डी वर्दोयो यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या पदाधिकाऱ्यांना भेटीसाठी आमंत्रित केले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. श्री एड्डी वर्दोयो यांनी भारत व इंडोनेशिया यांचे वाणिज्य, पर्यटन व सांस्कृतिक संबंध अतिशय चांगले असून उभय देशांमधील व्यापार व पर्यटन वाढीबरोबरच सांस्कृतिक संबंध वृध्दिंगत करण्यासाठी आपले कार्यालय प्रभावीपणे कार्य करेल अशी ग्वाही दिली. तसेच व्यापार व पर्यटनासंबंधी संयुक्त कार्यक्रमाच्या कार्यकक्षा निश्चितीसाठी 'महाराष्ट्र चेंबर' च्या पदाधिकाऱ्यांना इंडोनेशिया भेटीचे निमंत्रण दिले.

ललित गांधी यांनी यावेळी महाराष्ट्र चेंबर तर्फे महाराष्ट्रातील उत्पादने जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी 'मायटेक्स' या नावाने आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनांची श्रृंखला सुरू केल्याचे सांगुन ६ ऑक्टोबर पासून नाशिक येथे व २० ऑक्टोबर पासून पूणे येथे सुरू होणाऱ्या प्रदर्शनासाठी इंडोनेशियाचे उद्योजकांचे शिष्टमंडळास आमंत्रित केले, महावाणिज्यदूत (काऊन्सील जनरल) एड्डी वर्दोयो यांनी या आमंत्रणाचा स्विकार केला.

महाराष्ट्रातून कृषी उत्पादने, स्टील, ऑटोकंपोनंटस्, प्लास्टीक उत्पादने इंडोनेशियात निर्यात करण्यासाठी तसेच इंडोनेशियामधून खाद्यतेल, कॉफी, चॉकलेट, बांधकाम साहित्य यांच्या आयातीच्या संभावना निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाने १४ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर या कालावधीत इंडोनेशियाला भेट देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

याप्रसंगी चेंबरचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, सरव्यवस्थापक सागर नागरे, कार्यकारी अधिकारी नितिन भट आदि.

# महाराष्ट्र चेंबरचे पदाधिकाऱ्यांनी घेतली जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची भेट

## महाराष्ट्र चेंबर अंतर्गत उद्योजक व व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचे दिले आश्वासन



**जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या भेटीप्रसंगी महाराष्ट्र चेंबर्सचे पदाधिकारी.**

**जळगांव :** जळगाव जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरने च्या शिष्टमंडळाने त्यांची सदिच्छा भेट घेतली.

यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरच्या शिष्टमंडळाने त्यांना महाराष्ट्र चेंबरची माहिती देऊन जळगांव जिल्हा विकास परिषदेच्या अनुषंगाने जळगांव जिल्ह्यातील उद्योजक व व्यापारी यांचे आलेले निवेदन सयुंक्तपणे नवनियुक्त जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्याकडे देण्यात आले. त्यासह दर महिन्याला महाराष्ट्र चेंबरतर्फे प्रकाशित होत असलेली ' महाराष्ट्र चेंबर पत्रिका' दिली. जिल्हाधिकारी मा. श्री. आयुष प्रसाद यांनी चेंबरने दिलेले निवेदन स्वीकारले. त्यानंतर त्यांनी चेंबरच्या शिष्टमंडळासोबत संवाद साधला. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले, महाराष्ट्र चेंबर अंतर्गत आलेले जिल्ह्यातील विषय स्वतंत्र बैठक बोलाविली जाईल. या बैठकीत चेंबरने मागणी केलेले सर्व प्रश्न मार्गी लावले जातील, असे आश्वासन दिले. या वेळी गव्हर्निंग काऊन्सिल मेंबर व महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील यांनी महाराष्ट्र चेंबरची माहिती सांगितली. या वेळी महाराष्ट्र चेंबरचे सदस्य व उद्योजक विनोद बियाणी, श्यामसुंदर अग्रवाल, सचिन चोरडिया, अरविंद दहाड, ओमप्रकाश राठी उपस्थित होते.

# महाराष्ट्र चेंबर व्यापारी उद्योजकांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म व मोफत वेबसाईट देणार : ललित गांधी

### व्यापारी उद्योग व कृषी क्षेत्राचे प्रश्न सोडविण्यासाठी तिमाही बैठक घेणार

### महाराष्ट्र चेंबरतर्फे सर्व व्यापारी –औद्योगिक संघटनांची बैठक




**व्यापारी औद्योगिक व कृषी क्षेत्राच्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकी प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, उपाध्यक्ष नितीन बंग, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ आदी मान्यवर.**

**नाशिक** : व्यापारी उद्योजकांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म व मोफत वेबसाईट महाराष्ट्र चेंबर उपलब्ध करून देत आहे. व्यापारी उद्योग व कृषी क्षेत्राचे स्थानिक, राज्य व केंद्र स्तरावरील प्रश्न सोडविण्यासाठी दर ३ महिन्याला सर्व व्यापारी–औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन महाराष्ट्र चेंबर केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. नाशिक येथे बिजनेस बे, मुंबई नाका येथे सर्व व्यापारी, औद्योगिक व कृषी क्षेत्राच्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. त्या वेळी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, नाशिकमध्ये कॉमन फॅसिलीटी सेंटर उभारणे, एलबीटीच्या नोटिसाबाबत सयुंक्त बैठक आयोजित करून प्रश्न मार्गी लावला जाईल. ऑक्टोबरमध्ये नाशिक मधून नवीन मार्गावर विमान सेवा सुरु होईल. एपीएमसीचे प्रश्न सोडविण्यासाठी ५ ऑक्टोबर २०२३ ला व्यापारी परिषद होणार असून एपीएमसी कर रद्द होईल असा प्रयत्न आहे. नॅसकॉम कॉम तर्फे सर्व्हे करण्यात आला असून आयटी हब म्हणून नाशिक आणि नागपूरची त्यांनी निवड केली असून नाशिकमध्ये आयटी हब सुरु होण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे. तसेच डिजिटल प्लॅटफॉर्म व मोफत वेबसाईट संदर्भात सर्व व्यापारी व औद्योगिक संघटनांनी आपल्या सभासदांना माहिती द्यावी व अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करून आपला व्यापार उद्योग वाढवावा. या वेळी व्यासपीठावर वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष नितीन बंग, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ, नाईसचे अध्यक्ष रमेश वैश्य उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. त्यांनी मायटेक्स एक्स्पो–२०२३ ची माहिती देऊन नाशिक मध्ये व्यापार उद्योगांच्या नवीन संधी या माध्यमातून उपलब्ध होणार असून स्थानिक व्यापार उद्योगाला चालना मिळणार असल्याचे सांगितले. निमा अध्यक्ष धनंजय बेळे यांनी राज्यस्तरावरील प्रश्न मांडले.

सिन्नर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष किशोर राठी, हार्डवेअर अँड पेंट मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष संतोषकुमार लोढा, मुस्तगीर मोगरावाला, आयटी असोसिएशनचे अध्यक्ष अभिषेक निकम, इन्व्हेस्टमेंट असोसिएशनचे मुकेश चोथानी, पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे रवि जैन, ऑल इंडिया मोबाईल डिलर्स असोसिएशनचे सेक्रेटरी जुझेर दोराजीवाला, नाशिक धान्य घाऊक किराणा व्यापारी संघटनेचे राजेश मालपुरे, नाशिक धान्य किरकोळ किराणा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष शेखर दशपुते, नाशिक मोटर मर्चंट असोसिएशनचे माजी अध्यक्ष कैलास चावला, साजिद शेख, गाळेधारक व्यापारी संघटनेचे नरेंद्र वाळुंजे, निमाचे सरचिटणीस राजेंद्र अहिरे, आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ, संघटनेचे अध्यक्ष रामनाथ मुंदडा यांनी विविध प्रश्न मांडले. मायटेक्स एक्सपोचे कन्व्हेनर सचिन शहा, को कन्व्हेनर मिलिंद राजपूत, कार्यकारणी सदस्य रवी जैन, विकास पगारे, नीलिमा पाटील, दत्ता भालेराव, मिथिला कापडणीस, रवींद्र झोपे, भावेश मानेक, कैलास आहेर, संजय दिघे, राजेंद्र कोठावदे, अमित अलाई, बालकिसन धूत, प्रमोद दीक्षित, महेंद्र पटेल, कैलास पाटील, सोनल दगडे, पूनम उपाध्याय आदींसह विविध ४२ संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# 96th AGM NOTICE

**Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture**
Oricon House, 6th Floor, Maharashtra Chamber of Commerce Lane, Kala Ghoda, Fort Mumbai - 400 001

Friday 08th September 2023

**NOTICE**

To,
**All the Members of the Chamber,**

## 96th ANNUAL GENERAL MEETING OF MACCIA

Dear Sir / Madam,
Notice is hereby given that the 96thAnnual General Meeting of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture will be held on Friday, 22nd September 2023 at Babasaheb Dahanukar Hall, Oricon House, 6th Floor, Maharashtra Chamber of Commerce Lane, Fort, Mumbai – 400001 at 3.00 pm to transact the following business.

## AGENDA

1. To read the notice of the meeting.
2. To confirm the Minutes of 95th Annual General Meeting held on 15th September 2022.
3. To receive and adopt 96th Annual Report of the Chamber.
4. To receive and adopt the Audited Statements, Income & Expenditure A/c and Balance Sheet for the Year 2022-2023.
5. To appoint the Auditor for the next year and to fix their remuneration.
6. To inform the results of the Election held for the period 2023-2024 for the post of President and Sr. Vice President
7. To update about the Clusters /Regional Administrative offices /Common Facility Centers (CFC's)development
8. President's Address.
9. Any other subject with permission of the Chair.
10. Vote of Thanks.

Thanking you,
Yours faithfully,

**Sagar Nagare**
Secretary General(A)

**Note :** If the meeting is adjourned due to lack of Quorum, the meeting will be held at same venue after half an hour.

**96th Annual Day Celebration and Annual General Meeting of the Chamber is scheduled for Friday, September 22, 2023, from 11:00 AM to 5:00 PM.**

# ९६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस


महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन,
काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ४०० ००१


शुक्रवार दि. ०८ सप्टेंबर २०२३

## ९६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना


**चेंबरचे सर्व सभासद व सभासद संस्था यांना,**
स.न.वि.वि.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रिकल्चर या संस्थेची ९६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. २२ सप्टेंबर, २०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता बाबासाहेब डहाणूकर सभागृह, ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, काळाघोडा, मुंबई - ४००००१ येथे होणार आहे. तरी कृपया आपण या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

## सभेचे विषय

१. वार्षिक सभेची सूचना वाचणे.
२. दिनांक १५ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या ९५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून संमत करणे.
३. चेंबरच्या ९६ व्या वर्षाचा अहवाल वाचून संमत करणे.
४. लेखापरीक्षकांनी तपासलेला २०२२-२०२३ या वर्षाचा ताळेबंद व जमाखर्च मंजूर करणे.
५. आगामी वर्षासाठी लेखा परीक्षकाची नेमणूक करून त्यांचे मानधन नक्की करणे.
६. २०२३-२०२४ वर्षाकरीता अध्यक्ष व वरिष्ठ उपाध्यक्ष पदाच्या झालेल्या निवडणूकीच्या निकालाची माहिती देणे.
७. राज्यातील क्लस्टर्स/ विभागीय प्रशासकीय कार्यालये/कॉमन फॅसिलिटी सेंटर्स (CFC)विकास आराखड्याबद्दल अद्यायावत माहिती देणे.
८. अध्यक्षीय भाषण
९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्यावेळचे विषय.
१०. आभार.

कळावे,
आपला,



**(सागर नागरे)**
प्रभारी सरकार्यवाह

**टीप:** गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सभेचे कामकाज अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी होईल. त्याला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

**९६ वा वार्षिक समारोह व वार्षिक सभा असे संयुक्त आयोजन सकाळी ११ ते सायं. ५ या वेळेत संपन्न होईल**

MACCIA 100
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर

# ९६ वा वार्षिक अहवाल

# (१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३)

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरच्या सन २०२२-२३ या कालावधीतील कार्याचा अहवाल आपल्याला सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे. अध्यक्ष व वरिष्ठ उपाध्यक्ष पदाची निवडणूक बिनविरोध संपन्न झाली. अध्यक्षपदी माझी बिनविरोध निवड करून काम करण्याची संधी दिली त्याबद्दल सर्वप्रथम आपले आभार मानतो. अध्यक्षपदाची सूत्रे स्विकारल्यानंतर २०२२ ते २०२३ च्या काळात प्रत्यक्ष भेटीगाठी, दौरे, प्रत्यक्ष सेमिनार, चर्चासत्र, कार्यशाळा, बैठका, कार्यक्रम, विदर्भ विकास परिषद, जळगाव जिल्हा विकास परिषद, मायटेक्स एक्स्पो संपन्न झाले. कोरोना काळानंतर राज्यातील व्यापार उद्योगाला चालना देणे व पूर्ववत करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडली. केंद्र सरकार व राज्य सरकार दोघांशी समन्वय साधून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उद्योगमंत्र्यासह विविध मंत्र्यांसमवेत बैठका घेऊन व्यापार उद्योगांचे प्रश्न मार्गी लावण्यात यश मिळविले.

### पदाधिकाऱ्यांचे दौरे

महाराष्ट्र चेंबरच्या पदाधिकाऱ्यांनी राज्याच्या विविध भागात दौरे करून सभासदांच्या भेटी घ्याव्यात, त्यांचे प्रश्न, अडचणी समजावून घ्यावेत व ते सोडविण्यासाठी चेंबरच्या माध्यमातून प्रयत्न करावेत, यासाठी अध्यक्ष श्री. ललित गांधी व व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी राज्यभर दौरे करण्याचे ठरविले होते. त्यानुसार विदर्भ, औरंगाबाद, जालना, सिंधुदुर्ग, नाशिक, अकोला, जालना, हिंगोली, पुणे, रत्नागिरी आदीसह विविध ठिकाणी दौरे केले. या दौऱ्या दरम्यान स्थानिक व्यापारी उद्योजक व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत सभा, बैठका, चर्चासत्र आयोजित केले होते. यावेळी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती देऊन राज्याच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबरने सुरू केलेल्या कार्याची माहिती दिली. तसेच राज्यातील व्यापारी, उद्योजकांचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी विविध विभागाचे केंद्र व राज्य सरकारच्या मंत्र्यांशी समन्वय करून सोडविण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी समन्वय करून प्रामुख्याने उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर येथे विदर्भ विकास परिषद, जळगाव येथे जळगाव जिल्हा विकास परिषद यशस्वीरीत्या संपन्न झाली. या परिषदेत मांडलेल्या विविध अडचणी व समस्या उद्योगमंत्री श्री. उदय सामंत यांनी तातडीने सोडविण्याचे आदेश दिले. या परिषदांच्या माध्यमातून विदर्भ व जळगाव जिल्ह्यातील महत्वाचे प्रश्न व समस्या सोडविण्यात महाराष्ट्र चेंबरला यश मिळाले. तसेच केंद्र सरकारशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी केंद्रीय मंत्री पियुष गोयल, केंद्रिय एमएसएमई मंत्री श्री. नारायण राणे यांच्यासह विविध मंत्री महोदय व अधिकाऱ्यांशी समन्वय करून राज्यातील व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राचे प्रश्न व समस्या सोडविण्यात यश मिळविले आहे. तसेच राज्यातील व्यापार उद्योग, कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी तसेच देशातील परदेशातील व्यापारी उद्योजकांना मायटेक्स एक्स्पोचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. मायटेक्स्पो मुंबई येथे यशस्वीरित्या संपन्न झाले.

**सविस्तर अहवाल पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.**

MACCIA 100

Apex Chamber of the State 1927-2027

MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर

# वार्षिक सर्वसाधारण सभा इतिवृत्त

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रिकल्चरची ९५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सन २२-२३ मधील सभा गुरूवार दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई येथे संपन्न झाली.

सविस्तर इतिवृत्त पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

**Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture**

**INDEPENDENT AUDIT REPORT**

**Balance sheet As on 31st March 2023**
**Income & Expenditure Account for the year ended 31st March 2023 Schedules**

सविस्तर ऑडिट रिपोर्ट पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

Maharashtra Chamber Patrika is published every month, which consists of changing trends in the Economy of the state, various acts, statistics pertaining to Industry, taxation, information on availability of modern technology, articles by various experts on current issues etc. all taken up in the magazine and circulated to over 6000 Traders, Industrialists & Associations from all over Maharashtra state.

**Maharashtra Chamber Patrika** is circulated to over 7000 Traders, Industrialists & Associations from all over Maharashtra state. It is also circulated to Members of Parliament, Legislative Assembly and Executive authorities in the State & District levels of the Government. It serves as an excellent platform to reach to all the corners of Maharashtra, and especially among the business community.

**We sincerely appeal to you for your company advertisement in the upcoming edition.**

## ADVERTISEMENT TARIFF

| Sr. No | Advertisement | Dimension | Rate (including GST.) | Discount | Special Offer Rate for Members |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Full Page | Height 22 cm x Width 16 cm | 20,000 | 8000 | 12,000 |
| 2 | Half Page | Height 11 cm x Width 16 cm | 10,000 | 3000 | 7000 |
| 3 | Quarter Page | Height 5.5 cm x Width 8 cm | 5000 | 1000 | 4000 |
| 4 | Centre Spread | Height 22 cm x Width 36 cm | 100000 | 40000 | 60,000 |
| 5 | Inside Front Cover | Height 22 cm x Width 16 cm | 40000 | 10000 | 30000 |
| 6 | Inside Back Cover | Height 22 cm x Width 16 cm | 40000 | 10000 | 30000 |
| 7 | Back Cover | Height 22 cm x Width 16 cm | 50,000 | 10000 | 40000 |

**SPECIAL PACKAGE :**

- For 6 months - 1 Free Advertisement on 5 Paid Advertisements
- For Annual Package - 2 Free Advertisements on 10 Paid Advertisements
- Payment should be made in advance and Cheque drawn in favour of MACCIA.

**FOR BOOKING CONTACT :**

Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture (MACCIA)
**Head Office -** Oricon House, 6th Flr, Maharashtra Chamber of Commerce Lane, Kala Ghoda, Fort, Mumbai - 400 001, Maharashtra / **Tel: +91 22 6739 5811** / sagar@maccia.org.in

**Date of Publish : 12 September, 2023** **Page No. 1 to 48**
WPP License No.: NMR/Tech/WPP-21/Nashik/2022-23 License to Post without prepayment. Posted on 12 September, 2023 at Nashik
Head office Regd. No: NSK/RNP-82/2021-2023. Registered with Regr. of News Papers for India, Delhi under Regd. No. 20803/71

MACCIA 100
GLORIOUS 95 YEARS - MARCHING TOWARDS CENTENARY
Apex Chamber of the State 1927-2027

**MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE**

PRESENTS

**MAHARASHTRA'S**

# LARGEST TRADE FAIR

# MiTEXPO

**MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO**

| 06-09 OCTOBER 2023 | 20-29 OCTOBER 2023 | 19-28 JANUARY 2024 |
|---|---|---|
| NASHIK | PUNE | MUMBAI |



| | |
|---|---|
| INTERNATIONAL PAVILION | INTERIORS AND HOME DECOR |
| GOVERNMENT AND STATE PAVILION | BEAUTY, HEALTH AND FITNESS |
| ELECTRONICS AND DURABLES | PROCESSED FOOD |
| TEXTILES / FASHION & ACCS. | FARM AND AGRO |
| AUTOMOBILE-FOCUS ON EV | TRAVEL AND TOURISM |
| REAL ESTATE DEVELOPMENT | WRITING INSTRUMENTS |
| BUILDING MATERIALS | STATIONERY AND GIFT ARTICLES |

**Highlights**

- Delegations from various countries • TIE-UPS with Domestic & International trade bodies
- Seminars and Conferences • Cultural Programmers • Buyer Seller Meets

Supported by Government Of Maharashtra, Ministry of Textiles, Ministry of Road Transport and Highways, NSIC, MSME, Umed, Azadi Ka Amrit Mahotsav

**FOR DETAILS CONTACT :**

**Mr. Sagar Nagare,** Secretary General
Mob. 9870417866/8286008977, Email – sagar@maccia.org.in
**Vini Dutta,** Secretary
Mob. 9225619187, 0253 – 2577704, Email – vini@maccia.org.in

MAKE IN INDIA G20

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक विनी दत्ता यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स, सातपूर, नाशिक-७ येथे छापुन २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक-१ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to:
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
201, Sarda Sankul, Vakil Wadi, M.G. Road, Nashik-1